श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे
श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट

# मुखोद्गत घनपारायण सांगता सोहळा

श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जुलै २०२५ | वर्ष – १३ अंक – ७ अ | विशेषांक, पाने २० | Regn.No. - MAHMAR/2022/86035



*डावीकडून – श्री. बापूसाहेब इनामदार, डॉ. सुवर्णा पाटील, वे. मू. माधव परांजपे, वे. मू. गणेश जोगळेकरगुरुजी, वे. मू. मंदार क्षीरसागर, श्री. अशोकराव जोशी, वे. मू. योगेशजी बोरकर, श्री. विकासराव वालावलकर आणि वे. मू. मंदार फ़डके*

मिती ज्येष्ठ शु।। द्वादशी, शक १९४७; रविवार, दि. ८ जून २०२५ रोजी श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात सकाळी ठीक आठ वाजता, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेचे छात्र वे. मू. मंदार मधुकर क्षीरसागर यांनी मुखोद्गत ऋग्वेदपारायणाला प्रारंभ केला. या सोहळ्याची सांगता मिती श्रावण शु।। प्रतिपदा, शक १९४७; शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५ रोजी सकाळी आठ वाजता झाली.

या प्रसंगी संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे सेवामंडळाचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब इनामदार, ट्रस्टच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, वे. मू. माधव परांजपे, वे. मू. योगेशजी बोरकर (पारायण श्रोते) यांच्यासह पुण्यातील ब्रह्मवृंद, वेदाध्यायी आणि स्त्री-पुरुष भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान वे. मू. गणेश जोगळेकरगुरुजी (गोकर्ण महाबळेश्वर, कर्नाटक) यांनी भूषविले होते.

वे. मू. पुरुषोत्तम वझे आणि वे. मू.प्रथमेश पुरोहित यांनी ईशस्तवन पठण केल्यावर सूत्रसंचालक वे. मू. प्रसाद निगुडकर यांनी समारंभाचे अध्यक्ष वे. मू. गणेश वासुदेव जोगळेकर यांचा परिचय करून दिला.

श्री. गणेश वासुदेव जोगळेकर हे श्रीक्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर येथे वास्तव्यास असून आठव्या वर्षी उपनयन संस्कार झाल्यावर त्यांनी स्वगृही वडिलांकडे वेदाध्ययन केले. त्यानंतर पुण्यातील वेदचुडामणी श्री. दिनकरभट्ट फडकेगुरुजी यांच्याकडे काही भागाचे वेदाध्ययन झाले. त्यानंतर पुन्हा स्वगृही गोकर्णक्षेत्र येथे दशग्रंथासहित घनांचे अध्ययन पूर्ण केले. श्री कांची परमाचार्य पाठशाळेत व्याकरणशास्त्राचे अध्ययन केले. श्रीमान सांब दीक्षित यांच्याकडे षड्विध वेदभाष्याचे अध्ययन केले. त्यानंतर म्हैसूर येथे मीमांसाप्रवर श्री. वासुदेवशास्त्री परांजपे यांच्या गृही परंपरागतरीत्या समग्र पूर्वमीमांसा शास्त्राचे अध्ययन केले. तीर्थस्वरूप केशवभट्ट जोगळेकर व नेल्लोरनिवासी ब्रह्मश्री वेदमूर्ती श्री. विश्वनाथ श्रोत्री यांच्याकडे सप्रयोग ‘त्रिकाण्डश्रोत’ याचे अध्ययन झाले आहे. तसेच



वे. मू. पुरुषोत्तम वझे आणि वे. मू. प्रथमेश पुरोहित -ईशस्तवन



वे. मू. प्रसाद निगुडकर - प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन

कर्नाटक सर्वकाशिय घनांत परीक्षा ऋग्वेद (एम.ए.), श्रौत (एम.ए.) स्मार्त (एम.ए.) व आचार्य या पदव्या वैशिष्ट्य श्रेणीमध्ये प्राप्त केल्या आहेत. चतुर्वेदातील श्रौत उपयुक्त भागाचे अध्ययन उत्तम श्रेणीमध्ये प्राप्त केले आहे. भारतभर अग्निहोत्रादि सोमयागामध्ये विशेष नैपुण्य आहे. चेन्नई म्हैसूर येथे मान्यताप्राप्त संस्थांकडून हौत्रमर्मज्ञ व वेदशास्त्र प्रवीण अशा उपाधीने सन्मानित केले गेले आहे. सध्या सात-आठ विद्यार्थी गणेशशास्त्रींकडे श्रौतशास्त्र यांचे अध्ययन करीत आहेत.

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आदी देऊन श्री. अशोकराव जोशी यांनी अध्यक्षमहोदयांचा सत्कार केल्यावर, सभामंचावर स्थानापन्न झालेल्या सर्व मान्यवरांचा सत्कार पाठशाळेतर्फे वे. मू. परांजपेगुरुजी यांनी केला.

सूत्रसंचालक वे. मू. निगुडकर आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, ''भारताला दीर्घकालीन इतिहासाची परंपरा आहे. सातत्य हे भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे. अनेक राजकीय व धार्मिक आक्रमणे झालेली असूनही या संस्कृतीने आपले सातत्य कायम टिकवलेले आहे. कारण सर्वसमावेशकता हा या संस्कृतीचा मूलभूत पाया आहे. सर्वसमावेशकता, समन्वयवादी दृष्टिकोन यामुळेच या संस्कृतीने दीर्घकालीन इतिहासाची परंपरा टिकविली आहे. यात वेदविद्या ही केंद्रस्थानी आहे. त्यामुळेच भारताच्या प्राचीन इतिहासाला वेगळे व महत्त्वपूर्ण स्थान आहे. प्राचीन भारताच्या इतिहासात सिंधू संस्कृतीनंतरचा कालखंड हा वैदिक संस्कृतीचा काळ म्हणून ओळखला जातो. भारतीय समाजाच्या सर्वांगीण जीवनावर या संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. वेदकालीन आर्यांच्या सर्वांगीण जीवनाची माहिती मिळवण्यासाठी वैदिक वाङ्मय हे एकमेव साधन आहे. या काळातील कोणतेही उत्खनित किंवा पुरातत्विय साधने मिळत नसल्याने केवळ वैदिक वाङ्मयाच्या मदतीनेच या काळाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. भारतातील आर्यांच्या प्रारंभिक जीवनाची व सर्वांगीण जीवनाची माहिती मिळवण्यास वैदिक वाङ्मय हे एकमेव साधन आहे. जगातील प्राचीनतम वाङ्मय म्हणून वेदांचा उल्लेख केला जातो. वेद हे अपौरुषेय आहेत. त्यावरून अनेक ऋषी व कवींना वेदातील हे मंत्र स्फुरले किंवा त्यांना साक्षात्कार झाला व ते मंत्र, त्यांची रचना त्यांच्याकडून केली गेली. या वेदातील काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. जगात कोठेही न आढळणाऱ्या पाठांतराच्या पद्धतीने हे प्रचंड वाङ्मय कानामात्रेचाही फरक न होता हजारो वर्षे टिकलेले आहे. आर्यांचे व हिंदूंचे धर्मग्रंथ म्हणून वैदिक वाङ्मयाला सर्व भारतात पवित्र व मानाचे स्थान आहे. नंतरच्या काळातील व्यापक हिंदू धर्माचा विकास व भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास या वाङ्मयातील संकल्पनेतूनच झालेला आहे. प्राचीन काळातील धार्मिक, शास्त्रीय व ललित साहित्याचे हे वाङ्मय उगमस्थान मानता येईल. आर्यांचा इतिहास, आर्य संस्कृतीच्या विस्तृत अभ्यासाचे हे एकमेव साधन आहे. तौलनिक भाषाशास्त्राचा अभ्यास व भारतीय आर्य पूर्वजांची माहिती मिळवणे या वाङ्मयावरूनच शक्य झाले आहे. वैदिक वाङ्मयाची निर्मिती निरनिराळ्या काळात व प्रदेशात झाली असे दिसते. वैदिक वाङ्मयाच्या या वैशिष्ट्यांमुळेच मॅक्समुलर हा पाश्चात्य विचारवंत म्हणतो मानवाचा अथवा आर्य समाजाचा अभ्यास करावयाचा असेल तर वेदांच्या तोडीचे दुसरे साधन नाही. तसेच स्वतःच्या पूर्वजांच्या व इतिहासाच्या हिताचे संवर्धन आणि बौद्धिक विकास साधावयाचा असेल तर वेदाध्ययनाशिवाय अशक्य आहे. विद म्हणजे जाणणे, ज्ञान करून घेणे. वैदिक वाङ्मय विस्तृत असून त्यात अनेक ग्रंथांचा समावेश आहे. ऐतिहासिक काळातील सर्वच साहित्य त्यात एकत्र असल्याने भाषा व विषयांच्या दृष्टीने त्यात विविधता आहे. हे समाज जीवनाचे, धार्मिक आचार विचारांचे व संस्कृतीचे दर्शन या वाङ्मयातून होते. सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे ऋग्वेद. ऋग्वेदाच्या शाकल, बाष्कल, ऐतरेय व कौषितकी अशा कमीत कमी चार शाखा मानल्या जातात. त्यात प्रामुख्याने शाकल शाखा उपलब्ध आहे. ऋग्वेदात एकूण दहा मंडले असून १०२८ सुक्ते आहेत. वेदातील मंत्रांचे स्पष्टीकरणात्मक विवेचन या ग्रंथात करण्यात आले आहे. त्याला 'ब्राह्मण' ग्रंथ असे म्हणतात. वेदातील भाषा काही काळानंतर अवघड वाटू लागली. त्यातील मंत्रांचा



वे. मू. गणेश जोगळेकर यांचे स्वागत करताना श्री. अशोकराव जोशी



श्री. अशोकराव जोशी यांचे स्वागत करताना वे. मू. माधव परांजपेगुरुजी

यज्ञविधीत विनियोग करण्यासाठी त्याचे स्पष्टीकरण आवश्यक असते व त्यातून 'ब्राह्मण' ग्रंथांची निर्मिती झाली. ऋग्वेदकाळातील निसर्गाधिष्ठित धर्माचे नंतरच्या काळात आचाराधिष्ठित धर्माचे कसे रूपांतर झाले हे समजण्यास ब्राह्मण ग्रंथांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. अरण्यातील एकांतवासात ज्या ग्रंथांचा अभ्यास करावयाचा त्यांना 'आरण्यके' म्हणतात. कर्म व ज्ञान यातील मधल्या अवस्थेचे स्पष्टीकरण व काही प्रतिमात्मक उपासना यांची मीमांसा आरण्यक ग्रंथांनी केली. उपनिषदांना महत्त्व मिळाल्यानंतर आरण्यक ग्रंथाची निर्मिती कमी होत गेली. अशा अतिशय गूढ क्लिष्ट ग्रंथांचे गुरुसंनिध राहून अध्ययन करणे यासाठी किमान १२ ते १५ वर्षांचा काळ व्यतीत होतो. त्यानंतर मूळ संहिता आजीवन स्मरणात राहण्यासाठी पद, क्रम, जटा, घन अशा विकृतींसह अध्ययन झाल्यावर त्या व्यक्तीला 'सदशग्रंथघनपाठी' अशी पदवी प्राप्त होते. अशा विद्वानांचे खऱ्या अर्थाने समाजाने ऋणी राहणे अपेक्षित आहे. या वैदिक वाङ्मयाची जोपासना व वैदिक संस्कृतीची वाढ आज सर्वत्र होताना दिसत आहे. याचे कारण म्हणजे वेद व वेदप्रतींबद्दलची आत्मीयता. जसे वेद गुरुपरंपरेने जपले जातात त्याचप्रमाणे त्यांच्याविषयीची श्रद्धा हीसुद्धा परंपरेनेच येते. श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती महाराजांची वेदशास्त्रे, वैदिक पंडित यांच्या विषयीची आपुलकी आजही परमपूज्य श्री काकामहाराजांनी हेच व्रत अंगीकारून पुढे जात गुरुआज्ञेचे पालन करत एकाच वेळी ज्ञान व विज्ञान या दोन्हींचा समतोल राखत वेदपाठशाळेच्या माध्यमातून ज्ञान व डेरवण यासारख्या दुर्गम भागात सुसज्ज रुग्णालयाच्या माध्यमातून विज्ञान नवनवीन संशोधने; हे सर्व पार पाडत असतानासुद्धा वेदविद्येबद्दलची निष्ठा यत्किंचितही कमी झालेली दिसत नाही आणि त्यामुळेच आपल्याला आज श्रीमहाराजांच्या संकल्पनेची परिपूर्ती होताना दिसत आहे आणि त्याचा चढत्या आलेखाचे आपण साक्षीदार आहोत. याचबरोबर श्रीमहाराजांनी वेदमूर्ती किंजवडेकरगुरुजी व वेदमूर्ती सप्रेगुरुजींसारख्या निष्ठावंत अध्यापकांच्या साहाय्याने वेदपाठशाळा सुरू करून अनेक विद्यार्थी घडविले आणि त्यांचेच विद्यार्थी असणारे वेदमूर्ती माधव परांजप गुरुजींसारखे अध्यापक परमपूज्य काकामहाराजांनी नेमून वेदकार्याची धुरा त्यांच्यावरच सोपवली. ती गुरुजींनी सार्थ ठरवत अनेक विद्यार्थी घडविले. त्यातीलच वेदमूर्ती मंदार क्षीरसागर यांचे कष्ट हे सर्व असूनही तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे या वाक्यानुसार परमपूज्य श्रीबाबामहाराज, श्रीमहाराज यांचे आशीर्वाद, परमपूज्य काकांची प्रेरणा या सर्व गोष्टींमुळे आज पारायण निर्विघ्नपणे पूर्ण झाले. आज समाधी मंदिराने एक युवा वैदिक समाज दिला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

वेदमूर्ती घनपाठी मंदार क्षीरसागरगुरुजींनी आपल्या मातापितरांचा, गुरूंचा, श्रीबाबांच्या स्थानाचा नावलौकिक वाढवावा अशी मी सदिच्छा व्यक्त करतो. मंदार क्षीरसागर यांना सत्शिष्य परंपराही प्राप्त होवो, वेद परंपरा अखंडित राहो अशी सद्गुरुमहाराजांच्या चरणी प्रार्थना.''

यानंतर पारायणासाठी 'श्रवणकर्ते' ही महत्त्वाची भूमिका समर्थपणे पार पाडणारे वे. मू. योगेश बोरकरगुरुजी यांचा श्री अशोकराव जोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि नंतर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''सदाशिव समारंभां शंकराचार्य मध्यमं। अस्मदाचार्यपर्यंतां वंदे गुरुपरंपरां ।। सर्व गुरु परंपरेला वंदन करतो. ... गेले ४७ दिवस सुरू असलेल्या घनपारायणाची आज समाप्ती होत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचं म्हणजे वेद जो शिकत असतो त्याचं एक स्वप्न असतं की त्याने घनपारायण करावं. तर पारायणकर्ते वेदमूर्ती मंदार क्षीरसागर यांनी ऋग्वेदातील अतिशय कठीण समजल्या जाणाऱ्या घनविकृतीचे मुखोद्गत पारायण करून घनपाठींच्या पंक्तीत बसण्याचा मान मिळवला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. एका लयीत व म्हणण्यातील सहजता ह्या गोष्टी आनंद देणाऱ्या आहेत. यामागे त्याला घडविण्यात ज्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली ते वेदमूर्ती माधव परांजपेगुरुजी हेही तितकेच कौतुकास पात्र आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे समाधी मंदिरातील हे ५१वे धन पारायण असून या सर्व पारायणांपैकी कधी पारायणकर्ता, कधी श्रवणाची जबाबदारी



*श्री. विकासराव वालावलकर यांचे स्वागत करताना वे. मू. माधव परांजपेगुरुजी*

या सर्व गोष्टी परमपूज्य काकांचा माझ्यावरती असलेला स्नेह व त्यांचे आशीर्वाद तसेच माझ्या गुरुजींचे आशीर्वाद यामुळे हे शक्य होत आहे.

'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' ही उक्ती या समाधी मंदिरात सार्थ ठरत असून परमपूज्य दिगंबरदासमहाराजांनी सुरू केलेली वैदिक अनुष्ठाने, पारायणे, स्वाहाकार इत्यादी अनेक वैदिक अनुष्ठानांचे सातत्याने आयोजन करून वेदमूर्तींचा यथोचित सन्मान करून आम्हा वैदिक मंडळींना परमपूज्य काकांनी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. प्रथम आयोजन, तदनुसार नियोजन या गोष्टी येथेच उत्तम अनुभवास येतात. पारायणकर्ते वेदमूर्ती मंदार यांनी पुढचे आपले अध्ययन आहे त्यामध्ये 'संधी' यामध्ये थोडे परिश्रम करणे आवश्यक आहे. ते त्यांनी निश्चित करावेत. आपली पुढची वाटचाल अधिकाधिक उन्नत करावी तसेच त्यांच्या कडून उत्तरोत्तर वेदसेवा घडावी ही सद्गुरु चरणी प्रार्थना करतो आणि माझं मनोगत संपवतो.''

ज्यांच्या मार्गदर्शनाखाली ६ घनपाठी, २ क्रमान्त आणि अनेक विद्यार्थी श्रीवासुदेवानंत पाठशाळेमध्ये तयार झाले त्या वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, ''वेद:शिवा: वेदोशिव: । वेदाध्यायी सदाशिव: । तस्मात् सर्व प्रयत्नेन वेदाध्याय: सदा पठेत् । नमस्सभाभ्य: ।।'' व्यासपीठावरील माननीय अध्यक्ष गणेश जोगळेकर, परमपूज्य अशोक काका, त्यानंतर सर्व मान्यवर.

गेल्या दीड महिन्यापासून चालू असलेल्या मुखोद्गत घनपारायण महोत्सवाची आज सांगता होत आहे. वासुदेवानंतसरस्वती स्वामी महाराजांच्या या नवीन दगडी मंदिराच्या सभागृहात हे पहिलेच घनपारायण करण्याचे आणि घनपाठी म्हणून पदवी प्राप्त करून घेण्याचे भाग्य वेदमूर्ती घनपाठी मंदार क्षीरसागर यांना मिळाले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. वेदमूर्ती किंजवडेकरगुरुजींनी लावलेला वेदवृक्ष त्यांच्याच स्वरूपात आज आपल्यामध्ये उपस्थित असलेले वेदमूर्ती

।। श्रीगणेशाय नमः ।।
।।श्रीसद्गुरु वासुदेवानंत सरस्वत्यै नम:।।
।।श्रीसद्गुरु सहजानंद सरस्वत्यै नम:।।

**।। श्रीसद्गुरु वासुदेवानंत सरस्वतिपाठशाला, पुण्यपत्तनम् ।।**

**।। वेदमूर्ति मन्दार मधुकर क्षीरसागरमहोदयेभ्य: प्रदीयमाना प्रशस्ति: ।।**

वासुदेवानंत सरस्वतिनाम्ना चकास्ति या ।
पाठशाला पुण्यपुरे श्री माधव पराञ्जपे ।।
विराजत उपाध्यायस्तस्यां छात्रगणावृत्त: ।
अध्यापनरत:शान्त: शिष्यवात्सल्यसंयुत: ।।
तदन्तेवासिवर्योयं मन्दार: क्षीरसागर: ।
मीनाक्षी यस्य जननी पिता मधुकरो मत: ।।
प्राग्जन्मनां सुकृतिभि: घनान्तामध्यगीष्ट य:।
सब्राह्मणां दाशयतीं परीक्षाशाणसंस्कृत: ।।
श्रीकाञ्चीशारदादत्तपीठैस्संस्तुत्य सत्कृत: ।
पारायणैरनेकत्र विदुष: पर्यतूतुषत् ।।

**सोऽयं मन्दारशर्मा**

समर्थवेदवारिध्युपाधिभूषितस्य श्रीयोगेश्वरशर्मामहोदयस्य पर्यवेक्षणे कण्ठगम् ऋग्वेदघनपाठं हृद्यं निगध्य श्रीसद्गुरु वासुदेवानंत सरस्वतिस्वामिचरणानुकम्पाभाजनं विपश्चिन्मानसोदन्वद्धर्षवीचिनिदानं चाभूदिति अमन्दानन्दाप्यायितस्वान्तै: अस्माभि: पाठशालायच **'वेदवारिधि:' इत्युपाधिना सुवर्णकङ्कणेन विशेषमुद्रया च सभाज्यते ।** सच्छिष्यलक्ष्मीं पितृदेवभक्तिमनीहतांवेदनिषिद्धकर्मसु । धर्मे रतिं सज्जनतां दयालुतां दद्याच्छिवो भालगचन्द्रशेखर:

भवदीय:

***अशोक रघुनाथ जोशी***

विश्वस्त:(श्रीसद्गुरु वासुदेवानंत सरस्वतिपाठशाला)
विश्वावसौ श्रावण शुद्ध प्रतिपत्, शक १९४७, दि. २५ जुलै २०२५

श्रीगणेशायनमः।
श्रीसद्गुरुवासुदेवानंतसरस्वत्यै नमः। श्रीसद्गुरूसहजानंदसरस्वत्यै नमः।

**श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाला, पुणे**

## सम्मानपत्र

**वेदमूर्ती मन्दार मधुकर क्षीरसागर महोदय यांना देण्यात येणारे प्रशस्तिपत्र**

पुण्यामध्ये वासुदेवानंतसरस्वती नावाची पाठशाळा शोभत आहे. त्या पाठशाळेत शांत, सुस्वभावी, शिष्यवत्सल असे वेदमूर्ती श्री. माधव परांजपे उपाध्यायपदावर विराजत आहेत. त्यांचा अंतेवासी (शिष्य) व मीनाक्षी-मधुकर या दम्पतीचा सुपुत्र मन्दार क्षीरसागर आपल्या पूर्वजन्मीच्या अपूर्व पुण्याईने शाखेसहित ऋग्वेदाचे घनांत अध्ययन करून कांचीपीठ-कांचीपुरम, शारदापीठ-शृंगेरी, अवधूत दत्तपीठ- म्हैसूर येथील परीक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन तेथील संस्थानांकडून सन्मानित झाला. तसेच त्याने अनेक ठिकाणी आपल्या वेदपारायणाने विद्वानांना संतोषविले. असा हा मंदार शर्मा **समर्थवेदवारिधी** या उपाधीने भूषित वैदिकमूर्धन्य श्री. योगेश बोरकर महोदय यांच्या पर्यवेक्षणात

ऋग्वेदाचे कंठस्थ घनपारायण करून श्री वासुदेवानन्तसरस्वती स्वामी महाराजांच्या कृपेस पात्र व श्रोत्या विद्वानांच्या आनंदतरंगांसाठी कारण झाला. त्यामुळे अत्यंत आनंदित अशा अंतःकरणाने मंदार शर्मा याला आमच्याकडून व पाठशाळेकडून **‘वेदवारिधी’** या उपाधीने, सुवर्ण कंकणाने व विशेषमुद्रेने सन्मानित करण्यात येत आहे. सज्जन सदाचारी शिष्यरूपी लक्ष्मी, आई-वडील, देव यांचे ठिकाणी भक्ती, वेदनिषिद्ध कर्मांमध्ये निःस्पृहता, धर्माचरण करण्यामध्ये इच्छा, सज्जनपणा व दयाळूपणा ह्या सर्व गोष्टी भालचंद्र असा शिव तुम्हाला प्राप्त करून देवो ही प्रार्थना.

भवदीय:
अशोक रघुनाथ जोशी, विश्वस्त:
श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाला, पुणे
विश्वावसु, श्रावण शु. प्रतिपदा, शक १९४७;
दि. २५ जुलै २०२५

योगेश बोरकरगुरुजी यांनी वाढविलेल्या या वेदवृक्षाचे हे फळ आहे. वेदाअध्ययनासाठी कायम प्रेरणास्रोत असलेल्या काकामहाराजांच्या आशीर्वादानेच हे शक्य झाले आहे. ते प्रत्येकाला उत्साहित करत असतात. घनपाठी मंदार क्षीरसागर या विद्यार्थ्याला एकच सूचना आहे की आयुष्यात कायम विद्यार्थी म्हणून रहा. नवनवीन ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत रहा. आणि ‘ना रुद्रः क्रमपाठकः ।’ किंवा ‘वेदाध्यायी सदाशिवः।’ या उक्तीप्रमाणे रुद्राचा अंश असल्याशिवाय माणूस क्रमपाठी किंवा घनपाठी होऊ शकत नाही. त्यामुळे आता आपण देवमय आहोत. वेदांच्याच स्वरूपात शंकर आपल्या शरीरात वास करून आहेत. आपले आचार, आपले विचार, आपले आहार सात्विकतेने राहिले पाहिजे. आपले जीवन एक वेदव्रत आहे. नित्य स्वाध्याय होत राहिले पाहिजे आणि हे सर्व तुझ्याकडून होत राहील यात शंका नाही. कारण तुझ्यावरती काकामहाराजांची पूर्ण दृष्टी आहे. वेदमूर्ती योगेश बोरकरगुरुजींना घनपारायण श्रोता म्हणून या स्थानात वारंवार आमंत्रण करण्याचे भाग्य आम्हाला मिळो हीच वेदचरणी प्रार्थना!’’

सत्कारमूर्ती मंदार क्षीरसागर यांना पाठशाळेतर्फे देण्यात येणारे संस्कृत सन्मानपत्र आणि त्याचा मराठी अनुवाद वे. मू. सुशील पाटील यांनी वाचून दाखविला आणि समारंभाचे अध्यक्ष वे. मू. गणेश जोगळेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, मानपत्र आणि महादक्षिणा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पाठशाळेच्या आजीमाजी विद्यार्थ्यांतर्फे श्रीकाकांच्या हस्ते सुवर्णकंकण प्रदान करण्यात आले. परमहंस परिव्राजकाचार्य विधुशेखरभारती स्वामी (शृंगेरी मठ) यांनी पाठविलेले शुभाशीर्वादपत्र, वस्त्र, प्रसाददक्षिणा, रौप्यमुद्रांची माळ श्रीकाकांच्या हस्ते वे. मू. मंदार यांना अर्पण करण्यात आली. वे. मू. वसंतराव फडकेगुरुजी यांनी दिलेली सुवर्णांगुली वे. मू. मंदार



*श्री. बापुसाहेब इनामदार यांचे स्वागत करताना वे. मू. माधव परांजपेगुरुजी*

फडके गुरुजींनी यांनी अर्पण केली. यानंतर वे. मू. बोरकरगुरुजी यांच्या हस्ते सुवर्णपदक तर वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांच्याकडून सुवर्णहार अर्पण करण्यात आला. श्री. बाळासाहेब काजरेकर यांनी सुवर्णांगुली अर्पण केली तर श्रीवासुदेवानंत सरस्वती सेवामंडळातर्फे महावस्त्र, स्मृतिपदक, महादक्षिणा श्री. विकासराव वालावलकर यांच्या शुभहस्ते अर्पण करण्यात आली.

वे. मू. मंदार यांचे सहाध्यायी आणि पाठशाळेचे पहिले घनपाठी वे. मू. मनोज जोगळेकर यांनी या वेळी आपले विचार मांडले, ते म्हणाले, ‘‘ परमपूज्य श्री काकामहाराज यांच्या चरणी साष्टांग नमन. या सत्कार सोहळ्यामध्ये उपस्थित वेदमूर्ती श्री. गणेश जोगळेकरगुरुजी तसेच संस्थेचे विश्वस्त माननीय श्री. विकास वालावलकर साहेब आणि जे ४८ दिवस प्रत्येक मंत्र नीट म्हणवून घेणारे आमचे योगेशगुरुजी आणि व्यासपीठावर उपस्थित ब्रह्मवृंद व मान्यवरांना वंदन. श्रीकाकामहाराजांच्या अथक परिश्रम व आशीर्वादाने तसेच श्री. परांजपेगुरुजींच्या कष्टाने समाधी मंदिरात वैदिक घनपाठी यांची एक फळी तयार झाली आहे यात असंख्य लोकांचे सहकार्य लाभलेले आहेत. ही आपल्या सर्वांसाठी कौतुकाची बाब आहे. परिपूर्ण अध्ययन होण्यासाठी आईवडिलांचे आशीर्वाद, चिकाटी, मित्रांची मदत आणि गुरुकृपा अशा असंख्य गोष्टी जेव्हा एकत्र येतात तेव्हा एक घनपाठी तयार होतो. श्रीकाका महाराजांच्या प्रेरक



*डॉ. सौ. सुवर्णा पाटील यांचे स्वागत करताना वे. मू. माधव परांजपेगुरुजी*



*प्रवचनकार श्री. पद्मनाभ व्यास यांचे स्वागत करताना वे. मू. माधव परांजपेगुरुजी*



*वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांचे पूजन करताना पारायणी वे. मू. मंदार क्षीरसागर*

कृपाशीर्वाद सर्वात जास्त आहेत. आपल्या मुलांचे चांगले अध्ययन व्हावे म्हणून सतत पारायण निश्चित करून जिद्दीने आम्हाला तयार केले. श्रीमहाराजांच्या आशीर्वादाने अजून एक घनपारायण पूर्ण झाले त्यामुळे मंदार क्षीरसागर यांचे विशेष कौतुक. मंदारने घेतलेले कष्ट चिकाटी आणि जिद्द यामुळे त्याचे पारायणही उत्तम झाले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे कौतुक करतो आणि आदरणीय गुरुजन सर्वांना वंदन करतो व माझे चार शब्द संपवतो. धन्यवाद!''

सत्कारामुळे भारावून गेलेल्या मंदार क्षीरसागर यांनी सत्काराला भावपूर्ण उत्तर दिले. ते म्हणाले, ''... खरं तर मला काय बोलावं हे सुचत नाहीये. अशी सभेत बोलण्याची माझी पहिलीच वेळ. माझ्या वेदाध्ययनाची सुरुवात माझे आई-वडील, आजी-आजोबा, बाबामामा यांचा प्रेरणेतून आणि पाठबळामुळे २००७ साली झाली. प्राथमिक अध्ययन वेदभवन या ठिकाणी झाले. त्यानंतर माझे अध्ययन पूर्णपणे थांबलेले होते. मी मंदिरात २०१६ साली पुजारी म्हणून आलो. पण ह्या प्रवाहाच्या पूर्ण बाहेर गेलेलो असताना मला काकांनी पुन्हा प्रवाहात आणलं. अध्ययनासाठी प्रोत्साहन दिलं.गुरुजी पाठीशी होते. त्यामुळे मी पुन्हा अध्ययनाकडे येऊ शकलो. त्यानंतर माझे आजपर्यंतचे अध्ययन जे काही पूर्ण झालेले ते काकांच्याच कृपेने सगळं झालेलं आहे. मी दि. २६ फेब्रुवारी २०१६ रोजी धवल भावेगुरुजींच्या परिचयातून मंदिरात आलो. त्या वेळेला माझे शाखाध्ययन पूर्ण झालेले होते. मी शिक्षणासाठी आल्यानंतर दोन महिन्यातच मंदिरात ऐतिहासिक असे तेवीस घनपाठी विद्वानांचे घनपारायण झाले. त्या वेळी माझे पदाचे अध्ययन चालू होते. त्या वेळेला आमच्यातीलच पाटीलगुरुजी घनपारायणात बसलेले पाहून आम्हाला सर्व लोक प्रोत्साहन द्यायचे की तुमचेही असेच एक दिवस घनपारायण झाले पाहिजे.

पण त्यावेळी मला स्वप्नातही असे वाटले नव्हते की माझ्याकडून श्री महाराज असे कंठस्थ घनपारायण करून घेतील. माझे पदपाठाचे शिक्षण संपत असताना आम्ही सर्व जण डेरवणला उपग्रंथ अध्ययनासाठी गेलो. तिथेगुरुजी आम्हाला आठवडा-पंधरा दिवसातून एकदा संथा द्यायला खास पुण्यातून येत असत. त्यानंतर पुण्यात येऊन माझे पद आणि क्रमपाठाचे अध्ययन पूर्ण झाले. त्यानंतर मंदिरातील परीक्षेच्या वेळेला वेदमूर्ती मनीष पटवर्धनगुरुजी व वेदमूर्ती प्रथमेश जोशीगुरुजी हे परीक्षक होते आणि परीक्षेतच माझ्या लक्षात आले की मला अजून तयारी करण्याची आवश्यकता आहे. त्याचेच परिणामस्वरूप मला द्वितीय श्रेणी मिळाली. ते मी काकामहाराजांना सांगितले. तेव्हा काकांनी पाटीलगुरुजींना माझा अभ्यास घेण्यासाठी मंदिरात बोलावून घेतले आणि पाटीलगुरुजी सलग दोन-तीन महिने माझे क्रमाचे अध्याय पाठ घेण्यासाठी येत असत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या मंदिरातील, कांचीकामकोटी पीठातील व सोनगिरी पीठातील व अवधूत दत्तपीठ, म्हैसूर येथील सर्व परीक्षा चांगल्या प्रकारे चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण झालो. त्यानंतर जटापाठाच्या संथेच्या वेळी मनोज जोगळेकरदादाची खूप मदत झाली. त्याने त्याच्या घनपारण काळातसुद्धा विशिष्ट अवघड ऋचा मला माझ्याकडून खूप वेळा घोकून घेतल्या. जटेची संथा चालू असताना मला मंदिरातील २०२१ साली पंधरा घनपाठी विद्वानांच्या घनपारायणाला त्यांच्याबरोबर संपूर्ण घनपाठाच्या आवृत्ती म्हणण्याची संधी मिळाली. त्यानंतर जोगळेकरदादाचे पारायणही मला खूप जवळून अनुभवायला मिळाले. माझे सहध्यायी वेदमूर्ती सिद्धांत जोशी व समीर मिराशी यांनी मला वेळोवेळी सहकार्य करून नेहमीच अध्ययनासाठी प्रोत्साहन देऊन मदत करत आले. माझी जटापाठाची परीक्षा झाल्यानंतर घनपाठाची तयारी करत असताना मला जास्तीत जास्त वेळ देण्याचा परांजपेगुरुजींनी प्रयत्न केला. त्यासाठी ते कधी मंदिरात येत असंत तर कधी मी त्यांच्या घरी जात असे. तेव्हा ते गावाहुन आले असले किंवा त्यांच्याकडे पाहुणे आलेले असले, अगदी त्यांची तब्येत बरी नसली तरीसुद्धा त्यांनी माझ्या अभ्यासात खंड पडू दिला नाही. आमची घनाची परीक्षा झाल्यानंतर मी श्रीकाकामहाराजांकडे माझ्या घरच्या परिस्थितीमुळे शाळा सोडतो



*‘श्रोते’ वे. मू. योगेश बोरकर यांचे पूजन करताना पारायणी वे. मू. मंदार क्षीरसागर*



*‘श्रोते’ वे. मू. योगेश बोरकर यांचा सत्कार करताना श्री. अशोकराव जोशी*

असे सांगायला गेलो होतो. तेव्हा त्यांनी आता घन करण्याची तयारी कर असे मला सांगितले. त्यानंतर श्रीबाबा व श्रीमहाराजांचा नूतन दगडी मंदिराचे बांधकाम चालू असताना श्रीकाकामहाराजांनी आम्हाला वर्षभर पद व क्रम पाठाचे पारायण करायला सांगितले होते. त्याचा मला अभ्यासासाठी खूप फायदा झाला. पद-क्रमाच्या एवढ्या आवृत्त्या झाल्यानंतर मी श्रीकाकामहाराजांकडे मुखोद्गत जटा पारायणासाठी परवानगी मागितली. त्या वेळेस त्यांनी क्षणार्धात होकार दिला व ते पारायण त्यांच्या कृपेने उत्तम पार पडले. त्याच पारायणामुळे मला घनपारायणासाठी आत्मविश्वास मिळाला. त्यानंतर हे घनपारायण ठरले. वेदमूर्ती योगेश बोरकर श्रोता आहेत त्या गोष्टीचा आनंद होताच, पण त्याहीपेक्षा जास्त दडपण होते. पण गुरुजींनी मला खूप सांभाळून घेतले. ज्या गुरुजींचे घनाचे मंत्र आवडीने ऐकत ऐकत आम्ही लहानाचे मोठे झालो, तेचगुरुजी घनपारायणसाठी श्रोता म्हणून लाभले यासारखा आनंद नाही. यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो. माझा हा अध्ययनाचा प्रवास केवळ आणि केवळ श्रीबाबामहाराज, श्रीदिगंबरदासमहाराज आणि श्रीकाकामहाराजांच्या कृपेने सुकर झाला. नाहीतर माझ्या आळशीपणामुळे मला काहीच प्राप्त झाले नसते. माझ्या या एकंदरीत प्रवासात आमचे तीनहीगुरुजी वेदमूर्ती माधव परांजपेगुरुजी, वेदमूर्ती मंदार फडकेगुरुजी व वेदमूर्ती मिलिंद बोरकरगुरुजी हे ठामपणे पाठीशी उभे राहिले. मला काही लागलं आजारी पडलो किंवा काही असलं तरी माधवकाका, बापूकाका यांनी माझी खूप काळजी घेतली. बबनकाका, मनीषदादा यांनी माझे खाण्यापिण्याचे नेहमी खूप लाड केले. आपल्या पाठशाळेतील सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य व प्रेम मला लाभले आणि मंदिरातील सर्व स्वयंसेवक व भक्तगण यांच्या प्रेमाबाबत देखील मी कृतज्ञता व्यक्त करतो. ही विद्या महाराजांच्या कृपेने मला प्राप्त झाली तिचा विनयोग म्हणून जन्मोजन्मी त्यांच्याच चरणी वेदसेवा करण्याचे परमभाग्य लाभो. आज झालेल्या या सत्काराबद्दल मी संस्थेचा व पूजनीय काकामहाराजांचा ऋणी आहे. माझा केलेला हा सन्मान मी सद्गुरूंच्या चरणी अर्पण करतो. श्रीसद्गुरू बाबामहाराज, श्रीसद्गुरू दिगंबरदासमहाराज व श्रीकाकामहाराज यांचे असेच कृपाछत्र माझ्यावर अखंड राहो ही त्यांच्या चरणी प्रार्थना करतो!’’

यानंतर समारंभाच्या शेवटी समारंभाचे अध्यक्ष वेदमूर्ती गणेशशास्त्री जोगळेकर यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, ‘‘... सद्गुरू बाबामहाराज यांच्या या दिव्य अशा स्थानामध्ये उपस्थित श्रीमान काकामहाराज, विश्वस्त श्रीमान वालावलकरजी, व्यासाला व्यासपीठ देणारे श्रीमान पद्मनाभ व्यासजी, वैद्यकीय विभाग प्रमुख, स्थानीयगुरुजी श्री. माधव परांजपेगुरुजी, आमचे मित्र स्वाध्यायी, योगेश्वरगुरुजी, मंदार फडकेगुरुजी आणि निगुडकरगुरुजी, या उत्तम घनपाठाचे सत्कारमूर्ती असे मंदार क्षीरसागरजी, अनेक वेदाध्यायी त्यामध्ये अग्रगण्य श्रीमान स्वानंद धायगुडेगुरुजी, श्रीपादधायगुडेगुरुजी, कित्येक घनपाठी, वेदाध्यायी पटवर्धनजी, श्रीनिधी असे असंख्य घनपारायणकर्ते येथे आलेले आहेत. सगळ्यांना, त्यांच्यातील प्रत्येक वेदाक्षराला नमन करून अध्यक्षीय दोन शब्द काकामहाराज आज्ञेने बोलू इच्छितो.

.....वेदांच्या एवढ्या शाखा, चार वेद, सहस्राधिक सामवेद, अध्वर्यू शतशाखा, २१ शाखांचे ऋग्वेद आणि अथर्ववेदाच्या कित्येक शाखा या सगळ्यांचे वेदस्मरण भगवंत शिवापासून ऋषींपर्यंत प्रत्येकाने केले. या वेदांची कृती करणारे कोणीच नाही आहेत. नाही म्हणजे का? तर हे अपौरुषेय आहे. नित्य असे हे शब्दराशी आहेत जे ऋषींना स्मरणस्थळी प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या स्मरणाने त्यांनी स्मृतीतून श्रुती, श्रुतीतून स्मृती असे अविक्षुण्णरीत्या गुरुजनांपासून शिष्यांपर्यंत त्यांच्या स्मृतीमध्ये आणून बसवलेली ही दिव्य परंपरा सनातनाची आहे. अशा या वेदराशींचे घडवणे आणि टिकवणे यासाठीच ऋषींची मोठी परंपरा आहे. ऋषींच्या या परंपरेत प्रश्न येतो, ‘कोण ऋषिर्भविष्यतिइति’कोण हा ऋषी होऊ शकतो.

तर यो यो मंत्रार्थ चिंता अभियोग्य श्रुतीत आहात



*‘श्रोते’ वे. मू. योगेश बोरकर मुखोद्गत पारायणाविषयी बोलताना*



*वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांचा सत्कार करताना श्री. विकासराव वालावलकर*

श्रुती मार्गानुसारे, स्वतर्कानुसारे सुद्धा, विचार विनिमय करून, ऊह करून, निर्णय करून मंत्रांचे असेच अर्थ होऊ शकतात असा जो निर्णय करू शकतो तो ऋषी होतो. अन्य सर्व आपण वेदपाठी विप्र आहोत. यातील एक अक्षर समजायला आपल्याला कदाचित जीवन लागते. का, तर वेदाध्ययन एवढे कठीण विषय आहे. ‘वेदाध्ययनस्तु पंचधा’ असे शास्त्र सांगते. पाच तऱ्हेने वेदाध्ययन केले जाते. त्यातला आपण एक मार्ग आता सनातनातून या भारतीय संस्कृतीच्या कष्टकाळानंतर सुद्धा टिकून ठेवण्यात समर्थ होत आहोत. का? तर ही तर महाराजांची कृपा. आणि अविक्षुण्ण अशी ऋषींची परंपरा आहे. जी आपल्याला अध्ययनाकडे प्रेरित करते. आणि निष्कामरीत्या, निष्कल्परीत्या, दुपारची निद्रा सोडून, आपले अन्य व्यवसाय सोडून, शिष्याची घडवण करणे हे एकच ध्येय ठेवणाऱ्या गुरूंच्याकडे आणि त्या मुलाला घनपाठीपर्यंत तयार करण्याकरता प्रेरित करणारी त्यांची मातृशक्ती यांना या सर्वाचं वास्तविक श्रेयस पोहोचलं पाहिजे.

शिवाजी घडावे हे खरं आहे पण त्यासाठी जिजाऊ घडणे आवश्यक आहे. तसे घनपाठी तयार होण्यासाठी त्यांच्या मातृशक्तीने ही प्रेरणा घेतली पाहिजे. आपल्या मुलांनी वेदाध्ययन करावे आणि वेदानुसार धर्म जगावे आणि जीवन जगावे. संसारात कठीण काळ तर येणारच आहे. अविक्षुण्ण असा हा संसार आहे. जिथे समुद्राच्या लाटेप्रमाणे सारखे काहीना काहीतरी अडचणी आहेत पण यातून आपला मार्ग न चुकवता जसे वेदाने सांगितले तसेच जीवन जगणे, गुरूंच्या मार्गदर्शनात जगणे आणि आपला पाय चुकीचा जर जागी न पडेल आणि आपले विचार दुसरीकडे न जातील यासाठी स्थिरता ठेवणे हेच तर वास्तविक वेद सांगतो. एवढ्या वेदराशींमध्ये एखादा मंत्र जर का जीवनात अनुष्ठानात आला तर तो मनुष्य तरुन जातो. घनपाठामध्ये दहा हजार पाचशे बावन्न मंत्रांच्या लाखो पदांना एक-दोन, दोन-एक, दोन-तीन, तीन-दोन, एक-दोन-तीन याप्रमाणे स्वर लय ठेवून घेऊन उत्तमरीत्या ज्ञाता वक्त्याच्या, ज्ञाता श्रोत्यांच्या समोर, गुरूंच्या समोर बसून म्हणणे हे फार भाग्याची गोष्ट आहे. मंदारला हे चांगलं मिळालं आहे. त्याचे भरपूर अभिनंदन.

या मंत्र शक्तींना जागृत करण्याचे हे एक स्थान आहे. आम्ही लहानपणापासून ऐकत आहोत की वैदिक लोकांना हे स्थान आश्रितरीत्या वेदाध्ययन जपण्यासाठी व्यवस्था पूर्वीच्या महाराजांपासून आत्ताच्या काकामहाराजांपर्यंत सुद्धा चालू आहे आणि पुढे पण अविक्षुण्णपणे चालू राहील अशी आशा बाळगतो. का, तर आश्रय जर का राहिला नाही तर भारतीय संस्कृती जी वैदिक अविक्षुण्णआहे जी मानवीय संस्कृती आहे मानवीय धर्म संरक्षणासाठी आहे ती इराणपासून भारताच्या टोकापर्यंत येऊन पोहोचलेली आहे. एक आश्रयाचा अभाव झाला, राजाभाव झाला, राजांच्या वरती शक्ती ठेवणारे महाराजांचा अभाव झाला, त्याने ही संस्कृती, ही अध्ययन परंपरा ही छोटी छोटी रूपं घेत आपल्याला जिथे संरक्षण मिळेल अशा ठिकाणी येत शेवटी भारताच्या कोपऱ्यात एक ठिकाणी येऊन पोहोचलेली आहे. त्याला कोणीतरी काशी म्हणतात, कोणीतरी दक्षिण काशी म्हणतात कोणीतरी पुण्यपत्तन म्हणतात अशी काही क्षेत्रं या ठिकाणी राहिलेली आहेत. त्यांचे जतन करणे का सांगतोय मी तर अष्टाध्यायीमध्ये ‘वाहिक ग्रामेभ्यश्च’ असे एक सूत्र येते वाहिकग्रामाचा पाणिनीने उल्लेख केलेला आहे. ते वाहिक ग्राम आजच्या इराणच्या कोपऱ्यात आहे. तिथून भारतीय संस्कृती इथपर्यंत आली होती. आपली वेदाध्ययन परंपरा, शास्त्रज्ञ परंपरा; केवळ वेद कंठस्थ करणारी परंपरा नव्हे, ही फार चांगली टिकलेली आहे. का टिकली? तर निष्कामरीत्या आणि निरपेक्षरीत्या अध्यापन करीत होते. वैदिक मार्ग हे सांगतो अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह या षटकर्मी ब्राह्मणांनी अध्ययन निष्कामरीत्या केलेलं आहे म्हणून ही विद्या टिकली. अन्य विद्यासुद्धा होत्या त्या नष्ट पावत आल्या आणि त्यानंतर वेगळ्यावेगळ्या रूपाने त्या आत्ता प्रकटीकरण होत आहेत. उदाहरणार्थ वैदिक विद्या, वैद्यकीय विद्या, जलविद्या,



*वे. मू. माधव परांजपेगुरुजी आपल्या भावना व्यक्त करताना – ' आपले जीवन एक वेदव्रत आहे'.*



*वे. मू. सुशिल पाटील – मानपत्र वाचन*

तंतुविद्या, न्यासविद्या अक्षीविद्या असे वेगळे वेगळे अठरा तऱ्हेच्या विद्याचं वर्णन या ऋग्वेदांच्या सुक्तांमध्ये तेथे तेथे दिसून येते. एक लौकिक उदाहरण सांगतो महर्षी सुश्रुतांनी आपल्या सुश्रुत संहितेमध्ये कित्येक तऱ्हेचे अवजार जे वैद्यकीय सुश्रुशेला आवश्यक आहे हे तीन हजार वर्षांपूर्वी पाहून ठेवलेत आणि त्यांचे आकृती तशीच्या तशी बनवून आहे आत्ता जे ऑपरेशनसाठी डॉक्टर लोक वापरत आहे ते तसेच शस्त्र आहे जे सुश्रुतांनी सांगितलेले आहे. आणि यातील आश्चर्य वाटावा असा एक विषय आहे. मेटलर्जी म्हणून एक विषय आहे जो की धातुशास्त्राची संबंधित आहे. एखादा वैदिक सामान्यतः धनुष्य कसं असू शकतो किंवा राज्यभार कसा असू शकतो, दंड कसा असू शकतो किंवा वेदमंत्र, पूजा साहित्य, हवन साहित्य यांचा उपयोग कसा असू शकतो हे सांगू शकेल; एवढीच जर का धारणा वैदिकांच्या बद्दल समाजाची असेल तर सुश्रुतांनी मेटलर्जीचा अभ्यास करून त्यामध्ये अगदी छोट्याशा छोट्या धातूंमध्ये ऑपरेशन करण्याचे साहित्य कसं निवडलं आणि ते धातू धातूकार लोकांना सांगून तसेच्या तसे अवजार कसे बनवले? याचा अर्थ तो समाज त्या काळी तेवढ्या उत्तमरीत्या प्रगल्भित होता. जो की वैदिकांच्या आश्रित होता. वेदाध्ययन परंपरा नष्ट व्हायला लागल्या त्या अनुषंगाने अन्य शास्त्रंसुद्धा क्षीण व्हायला लागली आणि मनुष्याला जे आवश्यक असे शास्त्र आहे ते दूर जायला लागले. केवळ राजेशाही आली. त्यामुळे आपल्या संस्कृतीची अतोनात हानी झाली. त्यामुळे ही जी मानवीय संस्कृती आहे ती अन्य देशातून छोटीछोटी होत आपल्या भारतापर्यंत पोहोचली. मनुस्मृतीत स्पष्ट धारणा अशी आहे की ''अपुज्या यत्र पूज्यन्ते पूज्यानांतु विमानना। त्रीणि तत्र प्रवर्तन्ते दुर्भिक्षं मरणं भयं ।।'' जिथे पुजनीय लोक पूज्यांची पूजा करत नाहीत, जिथे जिथे विद्येचा अधिकार दिला जात नाही, जिथे विद्येचा सन्मान होत नाही तिथे दुर्भिक्ष आणि मरण आणि भय असे होत राहते. त्यामुळे विद्या जशी विद्या म्हणून आहे त्या विद्येला ओळखण्याचे सामर्थ्य समाजात निर्माण व्हायला पाहिजे. तर अशी गुरुपरंपरा सगळीकडे वाढली पाहिजे. वेदांमध्ये सांगितलेले आहे, ' तो गुरू आहे जो शिष्यांचा भार कमी करेल.' अशा गुरुचरणांनी योग्यरीत्या समाजाला उद्‌बोधन केलं तेव्हा अशी संस्था उभी राहते. तेव्हा या ठिकाणी न भुत ...(न भविष्यती म्हणत नाही मी!)... एकवीस लोकांचे इथे घनपारायण झाले. भरपूर लोकांचे असे घनपारायण भारताच्या कोपऱ्या कोपऱ्यात झाले पाहिजे तेव्हा वैदिक विद्या जी अध्ययन परंपरेपर्यंत तरी थांबलेली आहे त्याचा उजागर होईल. त्यानंतर अजूनही वैदिकांना भरपूर काम आहे. त्यासाठी समाजाने साथ दिली पाहिजे. आत्ता समाज वैदिकांना एक वेगळ्या रितीने पाहतोय किंवा वैदिक समाजात सगळीकडे मिसळले जात नाहीयेत. या दोन कारणामुळे समाज आणि वैदिक दोनरीत्या लांब लांब होत चालले. वेदाध्ययन उपोद्बलात् अशा शास्त्रांच्या शिक्षणासाठी वैदिकांच्या उत्तर संततीने याबद्दल विचार करून पुढे पाऊल ठेवावे. का? म्हणजे एक कुटुंबामध्ये घनपाठी तयार झाला की त्या ठिकाणी निश्चित पुढे घन चालू राहणार. तो कधी चुकणार नाही. तसेच त्यांना ती घनपाठी विद्या वेदविद्या लगेच येणार. पण त्यांना अन्य विद्येत त्यांची बुद्धिमत्ता फार प्रगल्भित असते. अन्य लोकांना तुम्ही पंधरा वेळा शिकवणे आणि वेदाध्ययींना तीन वेळा शिकवणे एवढ्या समानता असते. ते मंत्रशास्त्र, शब्द त्यातून गुरुजींची भावना पटकन मनात घेतात आणि त्या त्या विषयात शिरतात. किंबहुना उत्तम अशा विद्यार्थ्यांना, अन्य शास्त्रातील विद्यार्थ्यांना वेदाध्ययनाच्या या रितीचे शिकवण करा किंवा वेदाध्ययींना अन्य शास्त्रांमध्ये प्रवेश करावा म्हणजे अन्य शास्त्रीय लोकांमध्ये वेदाध्ययनची प्रवृत्ती होईल. वेदाध्ययनाचे अन्य काहीतरी प्रयोजन आहे हे लक्षात येईल. वेदाध्ययन म्हटलं की फक्त अध्यापन किंवा पौरोहित्य इथपर्यंत सीमित राहू नये. यातून बाहेर यावं. संस्कृत, शास्त्र, विचार, कर्मकांड, देशाचे शास्त्र, तंतुविद्या, नाना तऱ्हेच्या विद्यांचे अध्ययन करावं. यांचा समाजाला अजूनही उपयोग आहे. फक्त वेदात ठेवण्यासाठी यांचा उपयोग



अध्यक्ष वे. मू. गणेश जोगळेकर पारायणी वे. मू. मंदार क्षीरसागर यांना मानपत्र देताना



वे. मू. मंदार क्षीरसागर यांना पाठशाळेच्या आजी-माजी विद्यार्थ्यांतर्फे सुवर्णकंकण अर्पण करताना श्री. अशोकराव जोशी

नाहीये. यातून बाहेर आले पाहिजे. हे सगळं करताना आपण वैदिक आहोत हे मात्र विद्यार्थ्यांनी कधीच विसरू नये. दिवसाची तीन संध्या, ब्रह्मयज्ञ, आपल्या ऋषींचे स्मरण त्याचप्रमाणे गुरुचरणी लीनता आणि त्याच्याबरोबर आपले नित्य कर्म कधी न सोडता आपल्या या सदाचरणाने आपले आत्मसंरक्षण करायचंय. का? गुरुजन म्हणतात की उन्हाळ्यामध्ये जसं कृषीक बीजाचे संरक्षण करतो त्याप्रमाणे आमच्या गुरुलोकांनी आमच्यापर्यंत या वेदाध्यनानचे बीज आणून ठेवलेले आहेत. याचे फलित करण्याचे वेध आता येत आहेत. तर जास्तीत जास्त शिक्षणाकडे आणि दिवसातील संसारिक, औद्योगिक आणि गृहगत विषय, अन्य काही घनिक विषय या सगळ्यांच्याकडे वेळ ठेवूनसुद्धा वेदाध्ययनासाठी, जेवढा अभ्यासासाठी म्हणून दिवसातील स्वाध्याय विधीसाठी जो वेळ देत आहात त्याच्याबरोबर एखाद्या मंत्राच्या विचारासाठी आणि त्या मंत्रांचे चिंतनासाठी अवश्य वेळ द्या असे मी प्रार्थना करतो आणि जेव्हा एक व्यक्ती मोठी होते तेव्हा यश प्राप्त होतं, त्याच्याबरोबर कित्येक तऱ्हेची किल्मिषेसुद्धा तयार होतात समाजात असे मंत्र म्हणतो. देवीच्या वाक्सुक्तामध्येच आहे. ज्ञानसूक्तामध्ये, ''जो मोठा होऊ पाहतो आहे. जो मोठ्याकडे जातो आहे त्यालाच लोक किल्मिष नजरेने पाहतात. किंवा त्यानेच स्वत:ला मी सगळ्यांच्यात मोठा झालेलो आहे त्यामुळे माझ्यात काही किल्मिष आहे का असेपण बघण्याची आवश्यकता आहे.'' या मंत्राचे शेवटचे दोन शब्द म्हणतात की आपल्या शिकलेल्या विद्येवरती एवढा विश्वास ठेवावा की कधीही आपल्याला कमतरता भासणार नाही. जीवनभर आपली विद्या आपल्याला सोडणार नाही. आपण त्या विद्येला सोडणार नाही. त्यात मराठीमध्ये साधना नावाचा एक शब्द आहे सा धना साधं ठेवली तर त्याची अडचण नाही आणि साधं नाही तर ती विद्यापण नाही. त्यामुळे नित्य साधना असावी. नित्य जीवनात गुरूचे स्मरण असावं. 'गुरोस्मृतिं निर्मलबोधबुद्धीं । प्रदहीमेभार्गवी जन्मजन्मनि।।' असे देवीकडे मागितलेले आहे. तर अशा निर्मळ मनाने वेदाध्ययन करावं. आत्मशूचित्वाचे रक्षण करावं. त्यातून मिळालेले धन जास्तीत जास्त वैदिकांच्या वेदोद्धरणासाठी खर्च करावे. समाजासाठी उपयुक्त असे कार्य करावे. नित्य शिकण्याची बुद्धी ठेवावी. काहीना काही अध्ययन चालू राहावं. त्याने आपले किल्मिष जे आहे ते दूर जाते असे सांगितलेले आहे. अशा अंतर्गत मनाच्या वाचेचे दोन शब्द या ठिकाणी 'नमो वाचेयाचोरिता याचानुदिता ।।' अंतर्गत वाचेचे जे दोन शब्द आहेत ते गुरूच्या चरणी आपोआप लीन झालेले आहेत. जे काही आपल्या सर्वांच्या आचरणामध्ये ठेवलेले आहे ते आमच्या सर्व गुरूंचे आहे, आमचे काही चुकीचे असेल तर ते माझे आहे असे



वे. मू. मंदार क्षीरसागर यांना वे. मू. वसंतराव फडके यांच्या वतीने सुवर्णांगुली अर्पण करताना वे. मू. मंदार फडके



वे. मू. मंदार क्षीरसागर यांना वे. मू. योगेश बोरकर यांच्या हस्ते सुवर्णपदक अर्पण



वे. मू. मंदार क्षीरसागर यांना वे. मू. माधव परांज यांच्या हस्ते सुवर्णमाला अर्पण



मानाची पगडी – श्रद्धा, विश्वास आणि परीश्रमाचे फळ

सांगत, सर्व पुढे येणाऱ्या वैदिकांना, या संस्थेच्या अन्य अन्य वैदिकांना, कित्येक लोकांना वेगवेगळ्यारीत्या महाराज उपयोग करून देत आहेत. आम्ही जाणतो, कुठे असलं तरी, कर्नाटकाच्या टोकात असलं तरी की वेदाध्ययनासाठी ही संस्था किती कार्यरत आहे! कोणीही एक वेदाध्यायी आलातरी इथून तो रिक्त हस्ताने जात नाही. त्याला निश्चित काहीना काहीतरी थारा मिळतो आणि त्याची जीवन पद्धती बदलून जाते. कित्येक वैदिकांना याचीपण आवश्यकता आहे. त्याच्याबरोबर शिस्तबद्धता, नियमन ...'आयोजन आणि नियोजन' शब्द वापरला गुरुजींनी, आयोजनाबरोबर मीतर म्हणतो जेवढेगुरुजी लोक भारतामध्ये आहेत त्यांनी नियोजन बघण्यासाठी एकदातरी इथे येऊन जावं! आपल्या जीवनात त्यांचेपण संस्कार होतील. आपल्या जीवनात असंस्कृत विषय येतात समाजामुळे. गडबडीत काहीतरी पौरोहित्य करायला लागतं. त्याने अडचण सुरू होते. मंत्रांचा ऱ्हास होतो. प्रयोगमध्ये कमतरता येते. असं न होऊ देता आपण करणारा प्रयोग जो आहे तो दैवीकृपाप्रीत्यर्थ आहे हे ज्ञात होण्यासाठी अशा शुद्ध ठिकाणी येऊन इथले कर्मकांड, अनुष्ठान पाहावे. त्याने एक संस्कार होतो. सगळीकडे पौरोहित्याने, वेदाध्ययनाने, वेदाध्यापनाने जीवन संरक्षण करावे. अन्यान्य वृत्तीमध्ये प्रवृत्ती राहावी असे घनपाठी येथे भरपूर तयार व्हावेत. गुरुजींच्या मार्गदर्शनात त्यांना उत्तम घनपारायण करण्याची संधी मिळावी आणि आता भारतात ऋग्वेदाच्या घनपाठींची संख्या जवळ जवळ साडेचारशे आहे. यजुर्वेदाची सातशे वगैरे आहे. तर आनंदाने वाढते ऋग्वेद, कृष्ण यजुर्वेद, शुक्ल कण्व शाखा, सामवेदीमध्ये रहस्यांत शाखा, अथर्ववेदी शौनकीय शाखा असे सगळे वाढत आहेत. तर त्या सगळ्या वाढत्या शाखेबरोबर त्याची अध्ययन परंपरा आणि त्यांच्या उत्तम शिखर गाठणाऱ्या विद्यार्थ्यांचे सन्मान व्हावेत त्यांना एक थारा मिळावा असे गुरुचरणी प्रार्थना करीत माझ्या दोन शब्दांना विश्राम देत आहे. सद्गुरुनाथ महाराज की जय.''

आभारप्रदर्शन आणि वरयाचनापठणाने समारंभाची सांगता झाली.



वे. मू. मंदार क्षीरसागर यांना श्री बाळासाहेब काजरेकर यांच्याकडून सुवर्णांगुली अर्पण



श्रीवासुदेवानंत सरस्वती सेवा मंडळातर्फे महावस्त्र, स्मृतिपदक, महादक्षिणा श्री. विकासराव वालावलकर यांच्या शुभहस्ते अर्पण करण्यात आली.



वे. मू. मंदार यांचे सहाध्यायी आणि पाठशाळेचे पहिले घनपाठी वे. मनोज जोगळेकर यांनी आपले विचार मांडले



*''माझा हा अध्ययनाचा प्रवास केवळ आणि केवळ श्री बाबा महाराज, दिगंबरदास महाराज आणि श्रीकाकामहाराजांच्या कृपेने सुकर झाला.''*



*श्री. विकासराव वालावलकर 'श्रवणकर्ते 'वे. मू. योगेश बोरकरगुरुजी यांचा सत्कार करताना*



*''अभ्यासासाठी म्हणून दिवसातील स्वाध्याय विधीसाठी जो वेळ देत आहात त्याच्याबरोबर एखाद्या मंत्राच्या विचारासाठी आणि त्या मंत्रांचे चिंतनासाठी अवश्य वेळ द्या अशी मी प्रार्थना करतो ''– वे. मू. गणेश जोळेकर*



*श्रीवामनानंद सरस्वती यांच्या भेटीच्या वेळी वे. मू विजयेश सहकारी (डावीकडे) आणि वे. मू. मंदार क्षीरसागर*



*वे. मू. गणेश्वरशास्त्री द्राविड यांनी आवर्जून पारायणास उपस्थित राहून पारायणीस शुभाशीर्वाद दिले.*




*पारायण समाप्तीला उपस्थित श्रोतृवर्ग*



*डावीकडून – श्री. विकासराव वालावलकर, वे. मू. श्रीपाद धायगुडे, वे. मू. माधव परांजपे, वे. मू. गणेश जोळेकर, वे. मू. मंदार क्षीरसागर, वे. मू. मंदार फ़डके, वे. मू. स्वानंद धायगुडे, वे. मू. श्रीनिधी धायगुडे वे. मू. योगेश बोरकर, श्री अशोकराव जोशी*

*खाली बसलेले – वे. मू. पुरुषोत्त वझे, वे. मू. जयंत मय्यर, वे.मू. श्रीराम जोशी आणि वे.मू. प्रथमेश पुरोहित*

## श्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थानम, दक्षिणाम्नाय श्रीशारदापीठम्, शृंगेरी यांच्याकडून आलेले शुभाशीर्वाद



श्री श्री जगद्गुरु शङ्कराचार्य महासंस्थानम्,
दक्षिणाम्नाय श्रीशारदापीठम्, शृङ्गेरी
Sri Sri Jagadguru Shankaracharya Mahasamsthanam
Dakshinamnaya Sri Sharada Peetham, Sringeri - 577 139.

श्रीमत्सु जोशिकुलज अशोकशर्ममहोदयेषु प्रणामपूर्वकं निवेदनम् ।

भवत्प्रहितं पत्रं उभयेषां जगद्गुरुश्रीचरणानां चरणारविन्दसन्निधौ साष्टाङ्गप्रणामपूर्वकं समर्पितम् ।

पुण्यपत्तनस्थ श्रीसद्गुरुवासुदेवानन्तसरस्वतीपाठशालायां यथासम्प्रदायं अधीतसाङ्गऋग्वेदघनान्तः क्षीरसागरोपाह्वः वेदब्रह्मश्री मंदार मधुकर घनपाठी विश्वावसुज्येष्ठसितद्वादशीमारभ्य श्रावणशुक्लपंचमीपर्यन्तं पुण्यपत्तनस्थे श्रीसद्गुरुश्रीवासुदेवानन्तसरस्वतीसमाधिमन्दिरे वेदब्रह्मश्री योगेश्वर बोरकरमहोदयानां निरीक्षकत्वे कृत्स्नऋग्वेदघनपारायणं विधास्यतीति विज्ञाय श्रीचरणाः नितराममोदिषत ।

श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरयोरसीमानुकम्पया तदिदं वेदपुरुषसपर्यात्मकं पारायणं निरन्तरायं सम्पद्यतां , भवन्तः, वेदब्रह्मश्री मंदार मधुकर घनपाठिप्रभृतयश्च श्रश्रेयसपरम्पराभिस्समेधिषीरन्निति च श्रीचरणाः आशासते ॥

श्रीचरणानामादेशानुसारं तैरनुगृहीतान् आशीराशिरूपान् सरांकवस्वर्णमन्त्राक्षतान् श्रीशारदार्चनप्रसादं च प्रेषयामि ॥

03-05-2025 - शृङ्गगिरिः

इति निवेदयिता
टि. दक्षिणामूर्ती

Phone: 08265 - 250123 / 250192 • Fax: 08265 - 250792

वरील पत्राचा अनुवाद

**श्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थानम्, दक्षिणाम्नाय**
**श्रीशारदापीठम, शृंगेरी**
**Sri Sri Jagadguru Shankaracharya Mahasamsthanam**
**दक्षिणम्नाय श्री शारदा पीठम, शृंगेरी – ५७७ १३९.**

जोशीकुलोत्पन्न श्री अशोक शर्मा यांसी,
ब्रह्मांडाचे आध्यात्मिक गुरू अशा दोन्ही परमपुरुषांच्या चरणकमळांसमोर साष्टांग नमस्कारपूर्वक आपले पत्र अर्पण केले आहे.
पुण्यपत्तनातील श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती पाठशाळेमध्ये सांग ऋग्वेद घनांताचा अभ्यास केलेले वेदब्रह्मश्री मंदार मधुकर क्षीरसागर घनपाठी हे विश्वावसु ज्येष्ठ शुक्ल द्वादशी ते श्रावण शुक्ल पंचमीपर्यंत श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती समाधिमंदिरात वेदब्रह्मश्री योगेश्वर बोरकर यांच्या निरीक्षत्वात संपूर्ण ऋग्वेदाचे घनपारायण करणार आहेत हे जाणून श्रीचरणांनी आनंद व्यक्त केला.
वेदपुरुषाच्या कृपेने आणि श्री शारदाचंद्रमौलीश्वर कृपेने या वैदिक साहित्याचे पठण चालू ठेवा, जे परमपुरुषभगवंतांनी रचले आहे.
परमपुरुषांच्या चरणकमळांच्या आज्ञेनुसार आशीर्वादाच्या रूपात सर्व प्रकारची फुले, वस्त्र, स्वर्णमंत्राक्षता आणि प्रसाददक्षिणा पाठवीत आहोत.


निवेदिता
टी. दक्षिणामूर्ती

०३–०५–२०२५ – शृंगगिरी



परमहंस परिव्राजकाचार्य विधुशेखरभारती स्वामी (शृंगेरी मठ) यांनी पाठविलेले शुभाशीर्वादपत्र, वस्त्र, प्रसाददक्षिणा, रौप्यमुद्रांची माळ श्रीकाकांच्या हस्ते वे. मू. मंदार यांना अर्पण

## प.पू. वे. मू. गणेशशास्त्री द्राविड, वाराणसी, यांचे शुभाशीर्वाद



विश्वेश्वरस्य कृपया कार्याकार्यविवेचिका।
सर्गादितः सम्प्रवृत्ता श्रुती रक्षति रक्षिता॥
वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे ऋग्वेद घनपारायण वे. मू. योगेश्वर बोरकरांच्या आतृत्वात सहस्रबुद्धे मठात उत्तम रीतीने चालत आहे. गुरुजनांच्या तपाने वैदिक विद्वान् घडतात. तयार होणाऱ्या वेदमूर्तींचे योगक्षेम व्यवस्था करणे समाजाचे कर्तव्य आहे. तसे झाल्यास परंपरा टिकून राहील. पारायणकर्ता, पारायणश्रोता, वैदिक गुरुजन, मठातील अधिकारी आणि सर्व भाविकांच्या कल्याणासाठी श्री काशीविश्वेश्वर चरणी प्रार्थना करितो.

दि. १४।७।२०२५

गणेश्वर द्राविड
(गणेश्वर शास्त्री द्राविड)
साङ्गवेद विद्यालय
रामघाट, वाराणसी
उत्तर प्रदेश

## घनपारायणाच्या कालावधीत पारायणश्रवणासाठी मंदिरात येऊन विद्वान वैदिक ब्रह्मवृंद तसेच भक्तगण यांनी नोंदविलेले अभिप्राय

घनपारायण ऐकून आनंद वाटला प.पू. बाबा महाराजांच्यासमोर पारायण होत आहे हा एक विशेष योग आहे.
**– वे. मू. चं. र. कुलकर्णी**

खूप छान वाटलं! अर्थ कळत नाही तरीसुद्धा ऐकावसं वाटतं. मन शांत होतं. गुरुजींचं पाठांतर खूप छान आहे. स्वामींचीच कृपा! रोजच ऐकावसं वाटतं. – **आर्या निलेश सरपोतदार**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकण्याचा योग आला. अतिशय सुश्राव्य म्हणणे व म्हणण्याची सहजता मनाला भावणारी आहे. वेदमूर्ती योगेशगुरुजी श्रोते आहेत हे पारायणींचे भाग्यच! परमपूज्य काकामहाराजांच्या वेद प्रेमामुळे व पाठशाळेच्या गुरुजनांच्या कष्टामुळे संस्थेत वारंवार हा सुयोग प्राप्त होत आहे. पारायणींना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!
**– वे. मू. प्रथमेश र. जोशी, आळंदी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण उत्तमरीत्या चालू आहे. घनपाठी योगेश बोरकर जातीने लक्ष घालून श्रवण करीत आहेत. श्रीवेदपुरुष व महाराजांच्या आशीर्वादाने असेच उत्तम घनपाठी सिद्ध व्हावेत व वेदसंरक्षणरूपी राष्ट्रकार्य घडो अशी प्रार्थना!
**– वे. मू. गणेश वा. जोगळेकर, श्रीक्षेत्र गोकर्ण**

आज वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजी यांचे कंठस्थ घनपारायण ऐकण्याचा योग आला. अतिशय उत्तम आहे. म्हणताना कसलाही ताण किंवा दडपण जाणवत नाही. वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी श्रोता म्हणून लाभणे ही तर साक्षात महाराजांची कृपा! असेच उत्तरोत्तर घनपाठी या मठातून तयार व्हावेत ही महाराजांच्या चरणी प्रार्थना. **– वे. मू. सौरभ मुळे, ठाणे; ओंकार म. चिक्षे**

''घनपारायणं यस्तु सकृत्कुर्यात्त् द्विजोतम:।'' विश्वातील प्राचीनतम मौखिक पद्धतीने गुरुशिष्य परंपरेने अविच्छिन्न असे संरक्षित वाङ्मय म्हणजे वेद! याचे रक्षण ज्या अष्टविकृतींमुळे झाले त्यातील श्रेष्ठ म्हणून घनाचा उल्लेख होतो. दिव्य मेधाशक्ती व खडतर परिश्रम लागत असल्याने घनपरायणाचे महत्त्व आहे. असा दिव्य श्रुतीजागर आज सहस्रबुद्धे मंदिरामध्ये वेदमूर्ती मंदार क्षीरसागर यांच्या वाणीतून ऐकण्याचा योग आला. सहज आणि स्पष्ट वाणी ऐकून तृप्त झालो. तसेच पारायण– वे. मू.श्रवणकर्ते वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी हे उत्तम प्रकारे जबाबदारी पार पाडत आहेत. दोघांच्या चरणी नमस्कार. वेदपुरुषकृपेकरून आपणाकडून उत्तरोत्तर अशीच वेदसेवा श्रीचरणी अर्पण व्हावी ही सदिच्छा!
**– वे. मू. सिद्धिविनायक टाकळीकर, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण ऐकण्याचा योग आला. पारायण उत्तम चालू आहे. म्हणण्यातील सहजता व धाडस बघून आनंद वाटला. कमी वयामध्ये हे शिवधनुष्य पेलले आहे त्याबद्दल पारायणींचे कौतुक. योगेश्वरगुरुजी क्लिष्ट संधींच्या ठिकाणी मार्गदर्शन करत आहेत हे पाहून आनंद वाटला. पुढील पारायणासाठी शुभेच्छा व निरंतर अशी पारायणे घडावीत ही सद्गुरुचरणी प्रार्थना.
**– वे. मू. अवधूत जोशी, सातारा**

आज वे. मू. मंदारगुरुजी यांचे घनपरायण ऐकण्याचा उत्तम योग परमेश्वरकृपेने आला. ऐकून समाधान आणि मन:शांती मिळते. परमेश्वर आणि सद्गुरूंच्या कृपेने असे योग वारंवार येओत आणि क्षीरसागर गुरुजींकडून अशीच वेदसेवा वारंवार घडावी हीच सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना आणि गुरुजींना शुभेच्छा! त्यांचे म्हणणे ऐकूनच त्यांचे कष्ट किती असतील हे लक्षात येते. **– वे. मू. मंगेश जोशी, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे पारायण ऐकण्याचा योग आला. त्यांच्या म्हणण्यातील सहजता, त्यामागील कष्ट लगेच जाणवतात. त्यांचे कष्ट, सचोटी लहानपणापासून पाहण्यात आहे. अशीच वेदसेवा त्यांच्याकडून वारंवार घडावी हीच सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना!
**– शुभम, मयूर आणि अंकित**

हे घनपरायण 'याची देही याची डोळा' बघणे, ऐकणे हे आमचे भाग्य! वेदांची आणि आपल्या धर्माची जी सेवा घडते आहे त्यास वंदन! आदरणीय वे. मू. मंदार गुरुजींसारखे अधिकाधिक तेजस्वी युवक या धर्मकार्यात यावेत ही समर्थचरणी प्रार्थना.
**– वे. मू. अंकित काणे, पुणे**

हे घनपरायण अत्यंत श्रवणीय आहे. संपूर्ण घन कंठस्थ करणे कठीण आहे. वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे परिश्रम अत्यंत वंदनीय आहेत वेद पुरुष त्यांना आरोग्य देऊ दे अशी वेदपुरुषाला प्रार्थना!
**– वे. मू. वि. अ. दीक्षित**

घनपारायण करणे हे एक दिव्य काम आहे. शंकराची पूर्ण कृपा असल्याशिवाय हे शक्य नाही. त्यामुळे हे एक खूप अवघड काम आहे. वे. मू. मंदार क्षीरसागर यांना पारायणाच्या खूप खूप शुभेच्छा!
**– वे. मू. श्रीराम म. जोशी, वाकड**

भगवत्कृपेने वेदविद्येतील परिश्रम वाढत आहेत याचे गमक म्हणजे हे पारायण! उत्तम पठण होत आहे. फारच आनंद झाला. चिरंजीव मंदार व त्यांचेगुरुजी वेदमूर्ती परांजपेगुरुजी यांस अनेक साष्टांग नमस्कार.
**– वे. मू. देवदत्त शर्मा**

अत्यंत परिश्रम साध्य असे घनपारायण उत्तम प्रकारे चालू आहे. पारायण कर्ता व त्यांचेगुरुजी या दोघांचे अभिनंदन! उत्तरोत्तर अशीच वेदविद्या वृद्धी होवो ही वेदपुरुषाच्या चरणी प्रार्थना!
**– वे. मू. श्रीपाद शिवराम धायगुडे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे पारायण खूप श्रवणीय आहे. गुरुजींच्या व विद्यार्थी यांच्या परिश्रमाची ही एक अनुभूती आहे व उत्तरोत्तर अशीच प्रगती व्हावी ही वेदपुरुषाचरणी प्रार्थना! **– वे. मू. राजेंद्र पु. दाणी, नाशिक; वे. मू. मं. म. पुजारी, नृसिंहवाडी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे सुरू असलेले घनपारायण खूप उत्तम चालू आहे. खूप कष्ट करून मिळवलेली सहजताही दिसून येत आहे. वेद पुरुषाचे आशीर्वाद सतत त्यांच्या पाठीशी असोत हीच प्रार्थना!
**– वे. मू. हृषीकेश जोशी, दापोली**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांच्या ओघवत्या वाणीतून घनपारायण ऐकण्याचा योग आला. केलेले कष्ट आणि त्यामुळे म्हणण्यातील सहजता दिसून येते. खूप छान सुरू आहे पारायण. वेदोनारायणाचे आशीर्वाद सतत पाठीशी राहूदेत.
**– वे. मू. गी. भा. मुंडले, वे. मू. रामचंद्र भा. मुंडले, कुडाळ**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण उत्तमरीत्या चालू आहे आणि वे. मू. योगेश बोरकर यांच्या उपस्थितीमुळे दुग्धशर्करा योग आहे.
**– वे. मू. चंद्रकांत प्र. जोशी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण मनाला सुखद करणारे आहे. त्यांचे त्यामागील कष्ट, गुरुजनांचे शुभाशीर्वाद याचेच हे फळ आहे आणि महत्त्वाचे म्हणजे आम्ही त्यांचे बंधू आहोत याचा सार्थ अभिमान आहे!
**– वे. मू. निलेश कुलकर्णीगुरुजी, कांदळी**

महाराजांच्या कृपेने व गुरुजींच्या आशीर्वादाने वे. मू. बोरकर गुरुजींच्या निरीक्षणाखाली वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण मधुर
वाणीने, उत्तम लयीत चालू आहे. नुसतं घनांत अध्ययन न करता अतिशय परिश्रम करून विद्येचा महासागर पार करून घनपारायण करणे हे अतिशय कष्ट आहे. पारायणींकडून अशीच अनेक वेदसेवा घडो अशी सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना! **– अ. सं. पटवर्धन, सौ. मुग्धा अ. पटवर्धन**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे चालू असलेले मुखोद्गत घनपारायण श्रवण करण्याचा आज योग आला. उत्तम व श्रवणीय असे हे पारायण सनातन वैदिक संस्कृतीसाठी धर्मोत्कर्ष करणारे असे आहे. अगदी कष्टमय काळात मंदारजींनी गुरुकृपेने कष्टमय अध्ययन साध्य केले व आज वेदमूर्ती म्हणून नावारूपास आले. त्यांना खूप खूप शुभेच्छा आणि नमस्कार! गुरुजींनापण नमस्कार! पारायण श्रवणासाठी योगेशगुरुजींसारखे वेदमूर्ती लाभले हेही सौभाग्य! **वे. मू. केदार पाटणकर, वे. मू. शंतनू कळमकर, वे. मू. मानस पाटणकर, त्र्यंबकेश्वर**

आज वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकण्याचा उत्तम योग आला. **– वे. मू. ओंकार यशवंत देव, चिंचवड**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे चालू असलेले मुखोद्गत ऋग्वेद घनपारायण श्रवणाचा आज लाभ झाला. अतिशय परिश्रम व एकाग्रतापूर्वक उत्तम असे पारायण चालू आहे. असेच उत्तरोत्तर यश प्राप्ती होऊन मोठे नावलौकिक व्हावा हीच वेद भगवंताच्या चरणी प्रार्थना! **– वे. मू. प्रवीण शि. लोणीकर, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे चालू असलेल्या ऋग्वेद घनपारायण श्रवणाचा आज लाभ झाला. खूप छान घनपारायण सुरू आहे. उत्तरोत्तर अशीच प्रगती व्हावी ही सद्गुरुचरणी प्रार्थना.
**– वे. मू. प्रमोद जोशी, धायरी – पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण फारच सहज व सुंदर म्हणण्यामुळे मनाला अत्यंत आनंद देणारे असे आहे. त्यांनी त्याकरिता केलेले श्रम फारच आहेत. त्यांचे म्हणणे स्पष्ट आणि स्वच्छ आहे. पारायण परीक्षणाकरिता वे. मू. बोरकरगुरुजी असल्यामुळे पारायण अत्यंत काटेकोरपणे चालू आहे. वे. मू. माधव परांजपेगुरुजींनी विद्यार्थ्यांकरता भरपूर परिश्रम घेतले आहेत हे सहज लक्षात येते. सर्वांचे अभिनंदन! या पाठशाळेतून असेच विद्यार्थी सतत अखंडपणे तयार व्हावेत ही वेदपुरुषाच्या चरणी प्रार्थना!
**– वे. मू. द. म. मुरवणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपाठ आवर्तन खूप ऐकून खूप आनंद झाला. त्यांनी बालपणापासून खडतर परिश्रम घेऊन साधना पूर्ण केली याचा फार अभिमान वाटत आहे. मंदारचे वडील, आजोबा व पणजोबा यांच्याकडून अध्यात्मिक वारसा लाभला आहे. त्यांचे लोणी–धायरी येथे रामाचे मंदिर आहे. त्याची स्थापना सद्गुरू तुकाराममहाराजांनी केली आहे. त्यांनी गुरुपरंपरा जपली असून त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. मंदार यांना घडवणारे सर्व गुरुकुल गुरुजींचा खूप मोठा सहभाग आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि सर्वांना साष्टांग नमस्कार. तुमच्यामुळे मंदार प्रगती करू शकला याबद्दल सर्वांचे आभार, धन्यवाद! मंदारच्या पुढील वाटचालीला खूप खूप शुभेच्छा!
**– वे. मू. लक्ष्मीकांत मनोहर रायरीकर, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण उत्तम प्रकारे सुरू आहे. प्रत्येक विद्यार्थी व श्रोते यांच्यासाठी उत्तम पर्वणी! श्रोते वे. मू. योगेश बोरकरगुरुजी यांच्याबद्दल काय लिहावे? साक्षात वेदपुरुष असे श्रोते आहेत आणि समाधिमंदिर हे कायम वेदकार्य पुढे नेऊन सर्व वेद विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत आहेत. **– वे. मू. अ. शं. कुरुंभट्टे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण आवर्तन सेवा हे पाहून खूप आनंद झाला. खास भेटण्यासाठी मी श्रीक्षेत्र भीमाशंकरवरून आलो. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात घनपरायण करणारे विद्यार्थी तयार होत आहेत त्याबद्दल त्या गुरुजींना शतशः धन्यवाद! असेच विद्यार्थी तयार होत जाऊन समाजाच्या कार्यासाठी व हिंदू सनातन ब्राह्मण समाजासाठी सेवा करावी. आम्हाला काही सेवा करायची संधी दिल्यास आम्ही आनंदाने करू! **– वे. मू. रत्नाकर कोडिमकर, भीमाशंकर**

वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजींचे सर्वप्रथम अभिनंदन! आजच्या काळात भरपूर घनपाठी उपलब्ध असूनही घनाचे महत्त्व काही कमी झालेलं नाही आणि जाहीर पारायणासाठी खूप धाडस, चिकाटी आणि संयम लागतो; तो बाळगूनगुरुजी छान पारायण करीत आहेत. वे. मू. परांजपे गुरुजींचंपण अभिनंदन! त्यांनीपण भरपूर वेदकार्य केले आहे आणि सगळ्यात जास्त जबाबदारी श्रोत्याची असते त्या वे. मू. बोरकरगुरुजी तसेच वे. मू. सहकारीगुरुजी यांना शतशः प्रणाम. **– वे. मू. वामन हळबे**

वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजींचे अभिनंदन आणि सादर प्रणाम! घनपाठ ऐकून अतिशय आनंद झाला. पारायण उत्तम चालू आहे. आनंद वाटला. तयारी चांगली आहे. पुन्हा नमस्कार करतो. **– वे. मू. दी. चं. कुलकर्णी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायणाबद्दल ऐकून अतिशय आनंद झाला. पारायण अतिशय चांगले चालले असून असेच वरचेवर सगळीकडे पारायण व्हावे. तसेच वे. मू. बोरकरगुरुजी यांच्यासारखे पारायण ऐकणारे उत्तम श्रोते लाभले हे उत्तमच! **– वे. मू. श्रीकांत गोरेगुरुजी**

वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजींचे अभिनंदन! आपलं घनपारायण उत्तम चालू आहे आपले व वे. मू. माधव परांजपे गुरुजींचे अभिनंदन! अशीच वेदसेवा आपणाकडून घडावी! **– वे. मू. रघुनाथ कुलकर्णी**

अतिशय कष्ट साध्य व अप्राप्य असे घनपारायण ऐकण्याचा योग आला. वे. मू. मंदार क्षीरसागर व वे. मू. बोरकरगुरुजी यांना साष्टांग नमस्कार. दोघांना परमेश्वर आरोग्य देवो अशी प्रार्थना!
**– वे. मू. अरविंद भालचंद्र करंबेळकर**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांच्या अतीव परिश्रमाचा उत्कर्ष बिंदू असणारे ऋक्संहिता घनपारायण श्रवणाचा अलौकिक क्षण सद्गुरुकृपेने साधता आला. वे. मू. क्षीरसागर यांनी आपले कुटुंब, गुरुजन यांच्यासह आपल्या आर्य संस्कृतीचा वारसा पूर्ण करण्याचा घेतलेला ध्यास चिकाटीने पूर्ण केला त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! या वेदसेवा प्रवासात त्यांच्या जडणघडणीसाठी कारणीभूत असणारे पालक व गुरुवर्य यांचे खरंच कौतुक करावे ते थोडेच आहे! श्रीपरमेश्वराची अशीच सेवा वे. मू. क्षीरसागरगुरुजी यांच्याकडून अखंड होत राहावी ही परमेश्वराला प्रार्थना! वे. मू. परांजपेगुरुजी व इतर गुरुवर्य यांनी शिष्य निर्माण करण्यासाठी घेतलेले कष्ट निश्चितच साध्य होत आहेत. सर्व गुरुवर्यांचे खूप खूप अभिनंदन! असेच उत्तमोत्तम नावलौकिक मिळवणारे विद्यार्थी श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती वेदपाठशाळेतून असंख्य निर्माण व्हावे व वेदोनारायणाची सेवा अखंड राहावी अशा शुभेच्छा. वे. मू. बोरकरगुरुजींना साष्टांग नमस्कार. वे. मू. मंदार क्षीरसागर आपली कीर्ती दिगंत वाढावी. विपुल ऐश्वर्य, अखंड दीर्घायुष्य प्राप्त करून आणखी वेदसेवक विद्यार्थी आपणही घडवावे या शुभेच्छा! **– वे. मू. मंदार जोशी, कोल्हापूर**

आजच्या शुभ दिनी प.पू. बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात गेल्या आठ तारखेपासून सुरू असलेले वेदमूर्ती घनपाठी श्री. मंदारजी क्षीरसागरगुरुजी यांचे मुखोद्गत ऋग्वेद घनपाठाचे पारायण श्रवण करण्याचा सुयोग आला. अत्यंत स्वच्छ, स्पष्ट वाणी, शुद्ध उच्चारण निर्भ्रांत पाठांतर या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे मंदार गुरुजींचे घनपारायण! अतिशय समाधान वाटावे असाच हा क्षण! खूप आनंद वाटला. या सर्व उपक्रमात सर्वतोपरी साहाय्य करून अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने या स्थानात घडवणारे परमपूजनीय काकामहाराज यांना द्यावेत तितके धन्यवाद कमीच आहेत. त्यांच्यावर परमपूज्य स्वामीसमर्थ परमगुरू बाबामहाराज आणि दिगंबरदासमहाराजांची पूर्ण कृपा राहावी आणि त्यांना निरामय दीर्घायू प्राप्त होऊन असे उपक्रम सातत्याने या स्थानात त्यांच्या माध्यमातून होत राहतील ही सद्गुरुचरणी आणि वेद भगवंताचे चरणी सदैव अभ्यर्थना! मंदार गुरुजींचे भवितव्य आणि भविष्य तर उज्ज्वल आहेच ते अधिकाधिक ज्ज्वल होओ, वेद भगवंतांची त्यांच्यावर सदैव कृपादृष्टी राहो, अशा प्रकारचे अनेक उपक्रम त्यांच्याकडून सातत्याने होओत ही शुभेच्छा. विद्वच्चरणरज, **– वे. मू. प्र. ना. दंडगे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण अतिशय उत्तम रीतीने चालू आहे. वे. मू. बोरकरगुरुजी श्रवणासाठी लाभले हेही भाग्य! मंदिरात अनेक दशके चालू असलेल्या धर्मकार्याचे हे फळ आहे. सांप्रतकाळातसुद्धा विद्यार्थी मुखोद्गत पारायणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत हीच सद्गुरुकृपेची पावती आहे. अशीच उत्तरोत्तर कृपा आम्हा सर्वांवर राहो, अशी उत्तमोत्तम पारणे सर्वांना ऐकायला मिळोत ही वेदपुरुषाच्या चरणी प्रार्थना! नमस्कार. **– वे. मू. द. गू. टेंग्से**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण खूप छान चालू आहे. आम्हाला समाधान वाटत आहे कारण आम्हाला या पारायणाच्या श्रवणाचा लाभ मिळाला. तुमचे वेदमंत्र ऐकून वेदनारायण कृपेमुळे ही सर्व सेवा चालू आहे. एक अलौकिक ऊर्जा जाणवत आहे
**– ऋतुष याळगी, अभय जोशी**

'विदन्ति, जानन्ति, विद्यन्ते, भवन्ति विचारयन्ति सर्वे मनुष्या: सत्यविद्यां यैर्येषुवा तथा विद्वांसश्च भवन्ति ते वेदा:।' अर्थात ज्यामुळे सर्व सत्विद्यांना जाणता येते, प्राप्त करून घेता येते आणि ज्ञानवान होता

येते असे हे वेद आहेत आणि अशा या अपौरुषेय असणाऱ्या वेदांच्या रक्षणाासाठीच वेदांचा अभ्यास करून त्या वेदांचे आणि त्या अनुषंगाने सनातन वैदिक धर्माचेही रक्षण व्हावे म्हणून ही अशा प्रकारे मुखोद्गत वेद पारायणे होत असतात.

वेदांचा मुखोद्गत अभ्यास म्हणजे ध्वनी किंवा स्वरांमध्ये त्रुटी न करता केलेले वेदमंत्रांचे उच्चारण आणि या उच्चारणामुळे मूळ पाठ सुरक्षित राहावे, त्यांच्या स्वरांमध्ये अक्षरांमध्ये बिघाड, भेसळ किंवा एखादा अंशही लुप्त होऊ नये म्हणून ऋषींनी सुरुवातीलाच यामध्ये पाठ-विधि निर्धारित केले. यामध्ये तीन प्रकृती पाठ- १) संहिता पाठ २) पदपाठ आणि ३) क्रमपाठ (यामध्ये मंत्राचा मूळ क्रम आणि शब्द जशाच्या तसा उच्चारला जातो) आणि आठ विकृती पाठ आहेत- जटा, माला, शिखा, ध्वजो, रेखा, दंड, रथो, घन: (ज्यामध्ये विविध नमुन्यांनी शब्दांचा क्रम बदलला जातो).

अशा या पाठांमुळे प्राचीन काळापासून वेद कंठस्थ असूनही जसेच्या तसे काही बदल होतात संरक्षित आहेत. त्यामुळे ही परिवर्तन न होता जगातील एकमेव वाङ्मय उच्चारण परंपरा आहे. सध्याच्या काळात पद, क्रम, जटा आणि घन हे चारच पाठ प्रचलित आहेत. घनपाठ ही वेदांची सर्वात शेवटची विकृती, यात मंत्रातील शब्दांना तीन-तीन वेळेला परत-परत म्हटलं जातं, ज्यामध्ये मंत्रातील शब्दांचे, पदांचे गट आणि पुनरावृत्तींचा अभ्यास करून म्हटलं जातं. एका शब्दाला दुसऱ्या शब्दाबरोबर जोडलं जातं किंवा शब्दाला उलट केलं जातं. या सगळ्या पद्धतीमुळे वेदाभ्यासात मदत होतेच, शिवाय त्या मंत्राचा अर्थ व ध्वनी स्पष्ट करतात. असे हे ऋग्वेदाच्या घनाचे पारायण दि. ८-६-२५ पासून २५-७-२५पर्यंत बाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या समाधिमंदिरात सुरू आहे. वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजी आणि श्रवण आणि परिक्षण करण्यासाठी वे. मू. योगेश बोरकरगुरुजी आहेत. या दोघांच्या म्हणणीतून आणि अभ्यासातून हे लक्षात येतं की अध्यापक आणि शिष्य यांनी श्रवण आणि अभ्यास कसा केला पाहिजे, या दोघांतील नातं कसं असलं पाहिजे आणि याही पलीकडे जाऊन निष्ठा, श्रद्धा, सातत्य आणि मुख्य सद्गुरुकृपा असेल तर एखाद्या कार्य कसं पूर्ण होतं, ज्ञान कसं मिळतं आणि ते चिरकाल कसं टिकतं हे इथे अनुभवायला येत आहे. खरं पाहता हे लिहिणं जितकं सोपं आहे त्याहून या ६४ अध्याय आणि दहा हजार पाचशे ऐंशी मंत्रांना लक्षात ठेवून त्यांच्या प्रकृती सहित विकृतीचा अभ्यास करून ते कोणत्या प्रकारची त्रुटी न ठेवता कंठस्थ करून पोथीत न बघता म्हणणं हे फार अवघड आहे. त्यामुळे अशा सगळ्या वेदोनारायणांना शतशः नमन! अशा या पारायणांमुळे आमच्यासारख्या श्रोत्यांनाही आणि अभ्यार्थींनाही कसा अभ्यास करायचा असतो आणि अध्यापकांनाही/ परिक्षणार्थींनाही कसे असावे लागते हेही नव्याने शिकता येते.

अशी ही वेदांची पारायणे प.पू. बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात अव्याहतपणे चालू आहेत, याचे कारण भगवान वेदांची कृपा आहेच, शिवाय श्रीबाबामहाराज, श्रीमहाराज आणि श्रीकाकामहाराज यांच्याही असीम कृपेचं, आशीर्वादाचं हे फळ आहे. अशीच वेदांची नित्य श्रवणसेवा आम्हाला या मंदिरात नित्य मिळो ही सद्गुरुचरणी प्रार्थना! 'सनातन वैदिक धर्म हा वाढावा । उत्कर्ष तो व्हावा भारताचा' श्री गुरुदेव दत्त! **– सौ. माधुरी मिलिंद बोरकर**

वेदोनारायणाच्या कृपेने आणि सद्गुरूंच्या प्रेरणेने आज वे. मू. मंदार क्षीरसागर गुरुजींचे घनपरायण ऐकण्याचा योग प्राप्त झाला. अतिशय उत्तम रीतीने चाललेले पारायण ऐकून खूपच आनंद झाला. तसेच ऐकण्यासाठी लाभलेले वे. मू. योगेश गुरुजींना आणि पारायणकर्ते दोघांनाही वेद कृपेने उत्तम आयु: आरोग्य प्राप्त व्हावे अशी वेदपुरुषांचे चरणी प्रार्थना!
**– वे. मू. समीर मोरेश्वर हळबे**

आज समाधिमंदिरात गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी येणे झाले. वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजींचे घनपारायण ऐकण्याचा योग आला. सर्वांच्या दर्शनाने खूप आनंद झाला. मंदार क्षीरसागरगुरुजींना वेदोनारायण प्रसन्न होओ ही सदिच्छा! **– वे. मू. संतोष महाबळेश्वरकर**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांच्या घनपरायण श्रवणाचा योग आला. खूपच छान पारायण चालू असून, त्यांचे कष्ट व त्यांचे गुरुजी वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांचे अफाट कष्ट सफल झालेले दिसत आहेत. तसेच श्रीकाकामहाराजांचा आशीर्वाद हापण आहेच. वे. मू. योगेशगुरुजीपण एवढे दिवस उपलब्ध असणे हा पारायणकर्त्यांचा मोठा योग आहे. पारायण ऐकून खूप आनंद झाला. गुरुशिष्यांचे खूप अभिनंदन! **– वे. मू. स्वा. शि. धायगुडे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकण्याचा योग आला. वेदविद्येतील अत्यंत जटिल असे घनपारायण ते अगदी सहजपणे, लीलया करीत आहेत आणि श्रवणासाठी वे. मू. योगेशगुरुजी आहेत हेतर पारायणींसाठी परमभाग्य! श्रीकाकामहाराजांच्या आशीर्वादाने असेच विविध कार्य वाढत राहो. पाठशाळेतील सर्व गुरुजनांचे खूप खूप अभिनंदन व साष्टांग नमस्कार. वेदाय नमः।। **– वे. मू. कौशिक पांडे, आळंदी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे ऋ. घनपरायण छान चालू आहे. ऐकून आनंद झाला. श्रीकाकामहाराजांच्या आशीर्वादामुळे घनपारायण उत्तम चालू आहे. गुरुशिष्यांचे अभिनंदन! योगेशगुरुजींचे विशेष अभिनंदन आणि सगळ्यांना नमस्कार.- **वे. मू. सिद्धेश मुंडले**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकून छान वाटले. आनंद झाला. मंदारला मी शिकत असल्यापासून पाहात आहे. खूप कष्टाने जे साध्य होते ते त्याने करून दाखवले आहे व त्याचे गुरुजी यांनीसुद्धा सहस्रबुद्धे मठात अनेक विद्यार्थी घडविले व घडवत आहेत. प.पू.काकांच्या आशीर्वादाने हे सगळे घडत आहे. छान आहे. अशीच पुढेही परंपरा चालू राहो व भगवंताने त्यांना उत्तम आयुरारोग्य द्यावे यासाठी श्रीदत्तमहाराजांचे चरणी प्रार्थना. **– वे. मू. प्रमोद नरहरी देवस्थळी, सातारा**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे कंठस्थ वेद घनपारायण श्रवण करण्याचा योग आला. खूप छान प्रसन्न वाटले. असे योग दुर्मिळ असतात. आपल्या वास्तुत अशी वेदोनारायणाची सेवा अखंड चालूच असते. ती तशीच निरंतर चालू राहो. वे. मू. बोरकरगुरुजींनाही वंदन. आनंद व समाधान मिळाले.– **वे. मू. दिवाकर पांडुरंग ठाकूरदेसाई, डोंबिवली पूर्व**

बाबामहाराजांचे कृपेने वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे कंठस्थ वेद घनपारायण श्रवण करण्याचा योग आला. वे. मू. बोरकर गुरुजींना वंदन सद्गुरुकृपेने हे सर्व सुवर्णघन अनुभवायला मिळाले, आपल्याला पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा, आपल्यावर वेदोनारायण आणि सद्गुरू यांची कृपा अशीच निरंतर राहो अशी पूज्य बाबामहाराजांचे चरणी प्रार्थना.
**– वे. मू. मयुरेश मो. बायरे, डोंबिवली**

आज कर्क संक्रमण पुष्यकालामध्ये वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे कंठस्थ वेद घनपारायण ऐकण्याचे मोठे योग लाभले हे आमचे भाग्य. पारायण सुस्पष्ट, उत्तम, खणखणीत चालू असून पारायणकर्त्याचे कठीण परिश्रम व अभ्यास फळले असून गुरुवर्य वे. मू. माधव परांजपेगुरुजींचे श्रम व श्रीकाकामहाराज यांची वेदाबद्दलची कळकळीची काळजी दिसत असून पूज्य महाराजांच्या कृपेने असेच अनेक विद्यार्थ्यांकडून पारायण व्हावे व आमचे मित्रवर्य धनपाठी वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी हे श्रोता म्हणून लाभणे दुग्धशर्करा योग असून खूप आनंद झाला. उत्तम. पाठशाळेला असेच उत्तम विद्यार्थी मिळून वेदसेवा घडत राहो ही प्रार्थना.
**– वे. मू. सोमनाथ वासुदेव जोगळेकर, गोकर्ण कर्नाटक**

बाबामहाराज यांच्या आशीर्वादाने वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे कंठस्थ पारायण श्रवण करण्याचे भाग्य लाभले. वे. मू. बोरकरगुरुजींचे दर्शन झाले. बरेच परिश्रम करून हे भाग्य मंदार क्षीरसागर यांना प्राप्त झाले. श्रीवेदपुरुषाने अशीच कृपा त्यांच्यावर करावी. त्यांच्याद्वारे वेदसेवा नित्य घडावी हीच त्यांच्या चरणी प्रार्थना. **– वे. मू. घनेश असलेकर**

श्रीमहाराजांच्या कृपेने आणि वे. मू. परांजपेगुरुजींच्या विद्यार्थ्यांचे घनांत अध्ययन व पारायण इथे सहस्रबुद्धे समाधिमंदिरात होणे हे एक भाग्यच! वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी हे श्रोता म्हणून लाभले. वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे कंठस्थ पारायण उत्तम सुरू आहेर येथे असेच विद्यार्थी घडून, अशीच पारायणे करण्याचा योग लाभू दे, ही सद्गुरुचरणी प्रार्थना.
**– वे. मू. सं. व्यं. टेंग्से**

वेदाचार्य माधव परांजपेगुरुजींकडे घनांत अध्ययन करून आज घनपारायणापर्यंत वाटचाल करून चि. मंदारने आपल्या गुरूंचा व पाठशाळेचा अभिमान उंचावला आहे. त्याला स्वामी महाराजांचे व वेदपुरुषाचे भरभरून आशीर्वाद लाभोत तसेच उत्तरोत्तर अशीच प्रगती व्हावी ही वेदपुरुष चरणी प्रार्थना! **– वे. मू. समीहन कोल्हटकर**

‘वेदोऽखिलो धर्ममूलम् ।।’ सहस्रबुद्धे समाधिमंदिर यांच्यावतीने आयोजित ऋग्वेद घनपारायण फार सुंदर चालू आहे. पारायणकर्ते तसेच त्यांचे गुरुवर्य यांचे मनापासून अभिनंदन तसेच पारायण श्रोते वे. मू. बोरकरगुरुजी यांचेसुद्धा अभिनंदन! अत्यंत कठोर परिश्रम, वेदांच्या वरील श्रद्धा, तीक्ष्ण बुद्धिमत्ता या गोष्टी असल्याशिवाय असे पारायण केवळ अशक्य आणि म्हणूनच जेवढे कौतुक करावे तेवढे थोडे! शब्दांमध्ये व्यक्त करणे खरोखर कठीण आहे. वेदोनारायणाची ही सेवा उत्तम सुरू आहे. सर्वांना मनापासून धन्यवाद! याद्वारे आर्य सनातन वैदिक धर्माचे जागरण होते म्हणूनच विशेष आनंद वाटतो. आयोजकांचे विशेष कौतुक!
**– वे. मू. गोविंद वासुदेव घळसासी, कराड**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांनी वे. मू. माधव परांजपेगुरुजींकडे मठात राहून अतिशय कष्टाने आणिगुरुजी, आपले मातापिता, आपली कुलदेवता यांच्यावर श्रद्धा, आदर ठेवून व प्रामाणिकपणे वेद अध्ययन केले (षडंग सिद्धी घनान्त) त्याचे हे चालू असणारे घनपारायण फळ आहे. उत्तरोत्तर मंदार यांना असेच फळ प्राप्त व्हावे आणि उत्कृष्ट आयुरारोग्य लावावे ही ईशचरणी प्रार्थना **– वे. मू. श्री. दत्तात्रय र. जोशीगुरुजी, सातारा**

सर्व करविती सद्गुरू! प.पू. बाबामहाराज यांचे इच्छेने मंदिराची नेत्र दीपक भव्य वास्तू तयार झाली आणि त्याच्यामध्ये होणारे हे वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे पहिले पारायण ही त्यांच्यासाठी एक विशेष आठवण आहे आणि मला स्वतःला खात्री आहे या ठिकाणी महाराज १००० वर्ष राहतील आणि लाखो पारायणे ते करून घेतील. माझं पूर्वपुण्य, या मंदिरात मला खूप वर्ष राहता आले. शेकडो पारायणे केवळ सद्गुरू कृपेमुळे ऐकता आली. वे. मू. मंदारसकट आम्ही अनेक विद्यार्थी मंदिरात शिकलो व घडलो. मी स्वतः वे. मू. मंदार यांना खूप कष्टाने अभ्यास करताना बघितले. पण घनपाठ पूर्णत्वास जाऊन त्याचे पारायण होणं ही श्रीकाकामहाराजांची कृपा! मला अत्यानंद होत आहे कारण मी सर्व घनांचा लाभ घेऊ शकलो आणि आजचं पारायण अतिशय सुंदर सुश्राव्य होतं. वे. मू. मंदार यांना पुढील वाटचालीच्या खूप शुभेच्छा! सद्गुरू काकामहाराज व परमपूज्य बाबामहाराज यांना माझा साष्टांग दंडवत.
**–वे. मू. ओंकार करकरे आणि वे. मू. दीपक हनुमंत पटवर्धन, डेरवण**

‘विद्या संधिः सुखावहः ।’ या भागवतोक्तीप्रमाणे ही वेदविद्या नित्य सुखावहच आहे. व्यावहारिक सुख देतेच, पण ‘विद्ययाऽ अमृत मश्नु ते ।’ या उपनिषदातील वाक्यानुसार ही विद्या पारंपरिक सुखाचीही अनुभूती देते आणि अशी अनुभूती घेतलेले वेदमूर्ती घनपाठी योगेश्वर बोरकरगुरुजी हे या घनपरायणासाठी लाभले हा पारायणी यांचा भाग्ययोग आहे. तसेच पारायणी वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे हे ऋग्वेद मुखोद्गत घनपारायण अत्यंत सुस्पष्ट व एका लयीत चालू आहे ही स्वामींची कृपा असून पूज्य श्रीकाकामहाराजांचे आशीर्वाद आहेत. हे पारायण ऐकायचे मला भाग्य लाभले. अशीच पारायणींकडून वेदसेवा घडावी ही स्वामी समर्थ यांचे चरणी प्रार्थना. वे. मू. माधव परांजपेगुरुजी आणि वे. मू. मंदार

फडकेगुरुजी यांचेही खूप खूप अभिनंदन.
**– वे. मू. गणेश्वर आनंद पारखी, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे पारायण श्रवण करण्याचा योग आला. वे. मू. योगेश्वर बोरकरगुरुजी यांच्यासारखे श्रोते निरीक्षणासाठी लाभले हे भाग्यच आहे वे. मू. मंदार याने केलेल्या कष्टाचे घनपारायण हे फलित आहे. वेदाध्ययनासाठी उत्तम रितीने चाललेले पारायण ऐकून आनंद झाला. तसेच वे. मू. मंदारकडून वेदसेवा घडो ही ईश्वरचरणी सदिच्छा.
**– वे. मू. रोहित अजय नामजोशी, महाड**

वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजी यांचे चालू असलेले घनपारायण श्रवण करण्याचा योग आला. वे. मू. माधव परांजपेगुरुजी यांचे अथक परिश्रम आणि मंदार क्षीरसागर यांचे वेदाभ्यासाविषयीची तळमळ, कष्ट, जिद्द, फलद्रूप झाल्याचे आज समोर पाहायला मिळत आहे. या पारायणाला लाभलेले श्रोते वे. मू. योगेश बोरकरगुरुजी हेसुद्धा काळजीपूर्वक खास लक्ष घालून हे पारायण पूर्णत्वास नेत आहेत. त्यांचे दर्शन झाले, आनंद झाला. आजपर्यंत भरपूर अशी पारायणे सहस्रबुद्धे समाधिमंदिरात झाली. यामागे असलेली काकामहाराजांची तळमळ व वेदांवरची श्रद्धा याला माझे मनोमन वंदन. अशाच प्रेरणेचा स्रोत उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो आणि अशीच घनपारायणे उत्तरोत्तर घडत राहोत ही वेदोनारायणाच्या चरणी प्रार्थना.**– वे. मू. प्रकाश श्री. साधले**

घनपाठाबद्दल अभिप्राय लिहिण्याची माझी योग्यता नाही. वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजीं आणि मी मंदिरातच राहत असल्यामुळे त्यांच्या सहवासात आहे. ते खूप शांत व उत्साही आहते व दिवसभर पाठांतर करून गुरुजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे वेद शिकले व ते वे. मू. योगेशगुरुजींच्या परीक्षणाखाली घनपाठ करत आहेत, ते पूर्ण होईलच. गीताईमध्ये अध्याय १८ श्लोक ४२ असे आहेत–‘शांती, क्षमा, तप, श्रद्धा, ज्ञान, विज्ञान, निग्रह, ऋजता आणि पवित्र ब्रह्मकर्म’ असे सर्व गुण स्वभावत: योगेशगुरुजींच्या मध्ये आहेत असे परीक्षक मंदारगुरुजींना मिळाले व श्रीसद्गुरूबाबामहाराजांच्या नूतन ग्रॅनाईट मंदिरात मुखोद्गत ऋग्वेद घनपारायण झाले हे विशेष. त्यांना पुढील अभ्यासासाठी शुभेच्छा! मंदिरातील वे. मू. मंदार फडकेगुरुजी, वे. मू. मिलिंद बोरकरगुरुजी, वे. मू. माधव परांजपेगुरुजींना साष्टांग नमस्कार.
**– वि. चिं. पराडकर, पुणे**

अस्मन् सहपाठिन: वे. मू. मंदार क्षीरसागर महाभागा: श्रीसदुरुबाबामहाराजां समाधिमंदिरे घनपाठं कुर्वन्त: सन्ति इति अस्माकं अभिमानस्थानं । आबाल्यात मंदारस्य वेदाध्ययने रति: उल्लेखनीया आसीत् । तथैव वेदोनाराययणस्य गुरुवर्याणांच कृपा मंदारे वर्षति अस्माभि: अनुभूता च अस्ति । महत्कष्टसाध्यं इदं कंठस्थं घनपारायण कार्यं मन्दार: नैपुण्येन लीलयाच कुर्वन् अस्ति इत्येतत दृष्ट्वामन: प्रसन्नं अभवत् । वाचि स्पष्टता, शब्दोच्चारणे तेजस्विता, विचारे सुसूत्रता अनुभूयते । अद्ययावत नैके श्रोतार: अत्र उपस्थाय स्वाभिप्रायं अन्योन्य भाषायां लिखितवन्त: इति दृष्ट्वा श्रोतृणां अपि वेदेषु विद्यमाना प्रीति: अत्र लिखिता सर्वै: अवश्यं दर्शनीया अस्ति । घनपारायण श्रोतृत्वेन योगेश महोदय सदृशा:विद्वांस: उपलब्धा: इति अस्मान् मित्रवर्यस्यं भाग्यं तथा गुरुकृपा एव अस्ति । इत: परम वेदकार्यं कर्तुं मंदारस्य महती इच्छा अस्ति तदर्थं तस्मै सर्वं यथा अनुकूलं भवेत तथा परमेश्वर: कृपा विधातु इति उमारमणं रमारमणंच प्रार्थयामि । **– अद्वैतवेदान्त चूडामणी सौरभ सतीश कुलकर्णी**

वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे अभिनंदन! घनपारायण उत्तम प्रकारे चालू आहे. वेग, स्पष्टता व संधीज्ञान याची उत्तम सांगड घालत आपण करीत असलेले घनपरायण म्हणजे सर्व वेदप्रेमी लोकांसाठी उत्तम पर्वणीच आहे. आपल्याकडून वेदपुरुष व सद्गुरू अशी सेवा कायम करून घेत राहोत ही प्रार्थना. **– वे. मू. मधुकर लंगरे**

दिनांक ८.६.२५पासून सुरू असलेले वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपरायण श्रवणाचा योग खूप वेळा आला. मंदार याच्या पद, क्रम, दशग्रंथापासून आत्ता मुखोद्गत घनपारायणापर्यंतचा शैक्षणिक प्रवास मी खूप जवळून अनुभवला आहे. अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोडीला कष्टाची साथ देऊन मंदार खरोखरच ‘घन’ असलेल्या वैयक्तिक मुखोद्गत घनपारायणासाठी धैर्य, लय, माधुर्य इत्यादी पठणाचे गुण घेऊन समर्थपणे पारायण करीत आहे. पारायण श्रवणासाठी वैदिक क्षेत्रातील शीर्षस्थानी असलेले वेदमूर्ती योगेश बोरकर आहेत. त्यांना साष्टांग नमस्कार. भविष्यात मंदारकडून अनेक अशी वेदसेवा घडो ही वेदपुरुषाकडे प्रार्थना!
**– वे. मू. सुशील पाटील, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागरदादाचे पारायण आम्हाला संपूर्ण ५२ दिवस ऐकायला मिळाले हे आमचे भाग्यच आहे. मंदारदादाने पारायण काळात खूप कष्ट केले व खूप अवघड असे घनपारायण त्याने करून दाखवले. त्यामुळे आम्हाला विद्यार्थ्यांना खूप काही शिकण्यासारखे मिळाले. मंदारदादाला क्रमापासून अभ्यास करताना पाहिलेले आहे. त्यामुळे आम्हाला त्याचे घनपरायण ऐकून आनंद होत आहे. बाबामहाराजांच्या कृपेने अशीच घनपरायणे त्याच्याकडून होत राहोत हीच सद्गुरुचरणी प्रार्थना
**– श्रीधर कुलकर्णी, विद्यार्थी**

आपल्याला वेदमंत्र कानावर पडणे हे सुदैवाचे व भाग्याचे लक्षण आहे. त्याने आरोग्य व समाधान शांती मिळते हीच परमेश्वर कृपा/दया.
**– वे. मू. रघुनाथ जोशी, पाली**

वैदिकमूर्धन्य योगेशगुरुजी यांच्या निरीक्षणात सुरू असलेले वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे मुखोद्गत ऋक्घनपारायण श्रवण करण्याचा योग आला. सुस्पष्टता, लयबद्धता, मधुरता या गुणांनी युक्त अशा पारायणाचे श्रवण म्हणजे वेदरूपी क्षीरसागरचे मंद मंद क्षीरपानच! मंदार यांचेकडून अशीच वेदमाउलीची सेवा निरंतर घडावी ही प्रार्थना!
**– वे. मू. गणंजय धायगुडे, पुणे**

वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजी यांचे घनपरायण श्रवण करणे हे आमचे अत्यंत सद्भाग्य आहे. त्यांनी अत्यंत श्रमपूर्वक अध्ययन केलेले आहे. त्यांनी वेदसेवा करून पुढे हा वारसा चालवून भारताचे उज्ज्वल भाग्य घडवणे ही वेदपुरुषाचरणी प्रार्थना. **– कुलकर्णीगुरुजी**

वेदोनित्यं मधीयतां । आजपर्यंत अनेक ठिकाणी घनपरायण श्रवणाचा योग आला. आता या ठिकाणी चाललेले घनपारायण नित्याप्रमाणे श्रवणीय आहे. पारायणकर्ते वे. मू. मंदार क्षीरसागर व वे. मू. योगेशगुरुजी यांचे माध्यमातून या पारायणाची गोडी वाढतच आहे याच पद्धतीने वेदांची असंख्य पारायणे होत राहोत आणि आम्हाला श्रवणाच्या लाभ व्हावा. सर्वांवर सद्गुरुकृपा नित्य राहो ही वेद पुरुषचरणी प्रार्थना!

**– वे. मू. भूषण भास्कर काळे**

आज वेदमूर्ती घनपाठी मंदार क्षीरसागर यांचे घनपारायणाचा संक्षिप्त भाग ऐकण्याचे भाग्य मिळाले. मूळ वेदाध्यायन हेच खूप अवघड आहे. त्यानंतरची संपूर्ण वेदविकृती अत्यंत कठीण आहे. घनपाठी माधवजी परांजपे यांनी खूप चांगली तयारी करून घेतली आहे. श्रवणकर्ते घनपाठी योगेशजी बोरकर यांनी अनेक घनपरायणे श्रवण केलेली आहेत. सर्वच तपस्वी जन आहेत आणि जेथे हे अध्ययन पूर्णत्वाकडे गेले त्या स्थानातील सद्गुरुकृपेचे अनंत आशीर्वाद या उपक्रमाचे पाठीशी आहेत. कारण सद्गुरुकृपेशिवाय मनुष्यश्रम श्रेयस्कर होऊ शकत नाहीत. एकूणच हा त्रिमधुयोग झाला आहे. उत्तम शिष्य, उत्तम गुरू आणि सर्वोत्तम सद्गुरूकृपा! निश्चितच वेदोनारायणाच्या कृपेने या कंठस्थ घनपारायणाचे शुभ परिणाम भूमी मातेला, आपल्या संपूर्ण भारत वर्षाला आणि अखिल विश्वाला वरदायक ठरोत अशीच प्रार्थना परमेश्वराची चरणी करतो.

**– वे. मू. विवेक लक्ष्मण गोडबोले, सातारा**

वैदिक क्षेत्रात अत्यंत कठीण असलेल्या व सर्वोच्च असणाऱ्या घनात अध्ययन व घनपारायण करणारे सर्वच वंदनीय पूजनीय आहेत. त्यापैकी आज वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकण्याचा योग आला त्याचे पाठांतर व म्हणणी ऐकून त्यांनी त्याकरता घेतलेल्या कष्टाची जाणीव होत होती. अत्यंत सुंदर व निर्भीड सादरीकरण! त्यामुळे मंत्रमुग्ध झालो. पारायणकर्ता व श्रोता – दोघांना सादर वंदन! **– वे. मू. सं. शां. पाटील**

वेद संरक्षणाचे कार्य केवळ वेद मुखोद्गत ठेवण्यानेच शक्य आहे. यासाठी अत्यंत कष्ट घेऊन व प्रलोभनांचा त्याग करून अध्ययन करणे हे कार्य प्रशंसनीयच आहे. वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे या धार्मिक समाजावर घनपरायण करून उपकार झालेले आहेत. यामागे त्यांच्या स्वतःच्या कष्टाप्रमाणेच वेदमूर्ती परांजपे गुरुजींच्या कष्टाचेही चीज झाले आहे. समाधिमंदिरानेही अशा अनेक पारायणांमार्फत मोठे वेदकार्य अविरत चालू ठेवले. वेदाभिमानी लोकांकरता हा सोहळा अत्यंत उत्साहवर्धक आहेच. या कार्याला वाहून घेतलेल्या प्रत्येकाला सादर प्रणिपात.

**– वे. मू. दत्तात्रय साधले**

आज वे. मू. मंदार क्षीरसागर यांचे घनपारायण ऐकायचा योग आला. धन्य झाल्यासारखे वाटले. मंदारगुरुजी हे माझे लहानपणापासूनचे मित्र आहेत. आमचा मित्र घनपारायण करतो यासारखे सद्भाग्य नाही. खूपच बरं वाटलं. मंदार तुझ्याकडून अशीच सदुरूंची, वेदाची सेवा घडावी हीच महाराजांच्या चरणी प्रार्थना. **– अर्पिता जोशी, कल्याण**

आज वे. मू. मंदार क्षीरसागरगुरुजींच्या मुखोद्गत पारायणाचा शेवटचा दिवस. काकामहाराजांच्या कृपेने वे. मू. माधव परांजपेगुरुजींच्या अथक प्रयत्नाने व मंदारच्या प्रबळ कष्टाने, अशा त्रिवेणी संगमाने आज आमच्या शाळेतील दुसऱ्या घनपाठाचे पारायण संपन्न होत आहे याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. श्रीमहाराजांच्या कृपेने अशीच त्यांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, ही परमेश्वर चरणी प्रार्थना. वेदमूर्ती योगेश गुरुजींना शिरसाष्टांग नमस्कार **– वे. मू. स. वि. मिराशी**

पारायण ऐकून अत्यंत रोमांच अंगावर उभे राहत आहेत. पारायणकर्त्याची शारीरिक, मानसिक व बौद्धिक पराकाष्ठा अनुभवास येत आहे. पारायणकर्त्यांना खूप खूप शुभेच्छा. धन्यवाद. जय श्रीराम.

**– वे. मू. श्रीवल्लभ गिरीश कुलकर्णी**

मंदार यांचे घनपाठ आवर्तनाचे श्रवण करण्याचे भाग्य प्राप्त झाले त्याबद्दल समस्त ब्रह्मवृंद आणि मंदिराचा मी अत्यंत आभारी आहे. इतक्या लहान वयात इतके पाठांतर करणे ही दैवी कृपा आहे. यावर अभिप्राय लिहिण्याची माझी मुळीच योग्यतातर नाही, पण माझे पणजोबा श्रीधर शास्त्री लिमये हे वेदशास्त्रसंपन्न होते व श्री. मंदारजींच्या आवर्तनाचे श्रवण करताना मला त्यांची आठवण झाली व मन भरून आले. सनातन हिंदू धर्म संस्कृतीचे खऱ्या अर्थाने रक्षण, संवर्धन करणे येथे होत आहे. वेदांच्या ऋचांच्या प्रवाहात सुस्नात झालो. शब्द व अर्थ न कळताही या पठणाच्या कंपनाचा माझ्या शरीरावर व मेंदूवर अत्यंत सकारात्मक परिणाम होत असल्याचे जाणवत होते. मंदारजी आणि समस्त ब्रह्मवृंद तसेच या मंदिराचा मी अत्यंत आभारी आहे. मंदारजी तसेच परमपूज्य श्रद्धेय काकामहाराज यांचे चरणी साष्टांग प्रणाम.

**– गिरीश गणेश लिमये, पुणे**

आज मिती आषाढ वद्य ३०. पुणे वेदपाठशाळेच्या तीनही वेदाध्यापक व छात्रांसमवेत पारायण श्रवणाकरता आलो. पारायण ऐकून आनंद वाटला. शुद्ध वेद परंपरा टिकवण्याचा उपक्रम असाच घडत राहो आणि पुढील वेदाभ्यास करणाऱ्या छात्रांना प्रेरणा मिळून वेदपुरुषाची कृपा अखंड राहो. शुभेच्छा. **– वे. मू. अरुण वा. वझेगुरुजी, ऋग्वेदी स्मार्त चुडामणी, अध्यक्ष, पुणे वेदपाठशाळा, पुणे.**

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील–९९२१२ ५१६९५, उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव–९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर–९५८८४ ७९२२० नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035